

ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

फेब्रुवारी २०११ मूल्य १० रुपये

**दीपस्तंभ : षांताराम पवार**

**पुस्तकाचे प्रकाशन**

**चार दिवस, चार जिल्हे, चार तऱ्हा...**


दिनकर गांगल

**हे घडेल का महाराष्ट्रात?**

माणिक मुंढे

**ब्लेस यू माय चाईल्ड!**

निलू 'निरन्जना' गव्हाणकर



RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 40

## दीपस्तंभ : षांताराम पवार

संपादन : दीपक घारे, रंजन र. जोशी

मूल्य ३५० रु.  सवलतीत २०० रु.

षांताराम पवार यांचं व्यक्तिमत्त्व बहुरंगी आणि बहुढंगी आहे, त्यांचे विद्यार्थीही विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वानं स्थिरावले आहेत. चित्रकार, कवी, कलाशिक्षक म्हणून पवारांचा पडलेला प्रभाव दूरगामी आहे. गुरुजनांबद्दलचा आदर प्रत्येकालाच असतो. पण पवारांसारखे गुरू विद्यार्थ्यांच्या उत्तरायुष्यातही महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांच्या वाढत्या कलाजाणिवेबरोबरच आपलाही कलानुभव नित्यनूतन ठेवतात. एका वेगळ्या पातळीवरचा संवाद आजही त्यांच्या काही प्रथितयश विद्यार्थ्यांबरोबर चालू असतो.

अशाच काही विद्यार्थ्यांचे पवार सरांवरील व्यक्तिदर्शनपर लेख, जोडीला स्वत: षांताराम पवारांचे लेख आणि पवारांचा काळ जिवंत करणारे प्रा. मं.गो. राजाध्यक्ष यांचे चरित्रकथन घालून हे पुस्तक आकाराला आले.

दीपस्तंभ हा मार्गदर्शक असतो. त्याचं आकलन आपल्या वाढत्या वयानुसार बदलत असतं. अशाच एका कलाक्षेत्रातल्या दीपस्तंभाची ही कहाणी....

'दीपस्तंभ' या पुस्तकप्रकाशनासमयी डावीकडून दीपक घारे, प्रा. मं.गो. राजाध्यक्ष, संजय पवार, डॉ. रवी बापट, षांताराम पवार, अरुण साधू आणि 'मेडिमिक्स'चे प्रदीप



'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा संडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**फेब्रुवारी २०११ वर्ष ३१ वे,**
**अंक दुसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **अरुण जोशी**
मुखपृष्ठावरील चित्रे : **अरुण काळे**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

'धावतं जग' असं एक वृत्तपत्रीय सदर होतं. आता मात्र ते इतकं धावतंय की त्या गतीत मती हरवली आहे. अंगावर आलेल्या–ओढवून घेतलेल्या– गतीत गरगरलेल्यांना आपली 'स्पेस' हवी वाटू लागली आहे. हा गोंधळ आजचा नाही, गती नव्हती तेव्हापासूनचा आहे. 'मीठ–भाकर खाऊन सुखात जगतो' असल्या उदात्त विचारांनी भरभराटीची स्वप्नं पाहिली नाहीत. वास्तविक, मीठ–भाकर खाऊन कुणी सुखी वगैरे नसतो, आणि गेल्या वीस वर्षांत या जगण्याला मिळालेला छेद इतका अकल्पित होता की त्यातही गोंधळच निर्माण झाला. मतीविना गती गेली म्हणणाऱ्या जगात गती आली खरी; तरी प्रगती कुणाची झाली हा प्रश्न उरतोच.

एक आध्यात्मिक अतिरेक, दुसरा भौतिक. त्याच्यावरच्या चर्चाही अतिरेकी आणि उपायही. तरी आपण प्रगतीचा दावा करतो. या अंकात माणिक मुंढे यांनी गुजरातमध्ये मोदींनी चालवलेल्या समाजोपयोगी आगळ्या उपक्रमांबाबत लिहिले आहे. अतिरेकी हिंदुत्व पोसणाऱ्या मोदींचे हेही एक रूप. त्यांनी गुजरातमध्ये आपली स्पेस निर्माण केली आहे हे सांगताना माणिक मुंढेंनी इतर प्रश्न वाचकावर सोडले आहेत. मात्र पुरोगामी महाराष्ट्रात हे घडेल का, हा त्यांचा प्रश्न आहे.

चंद्राबाबू नायडूंनी अशी स्पेस निर्माण केली होती, आता बिहारमध्ये नितीशकुमार यांनी उद्दामपणा आणि गुंडगिरीच्या साम्राज्यात विकास आणि कायद्याची स्पेस निर्माण करण्याची धमक दाखवली आहे आणि महाराष्ट्रात? स्पेस म्हणजे भूखंड! या विचारी प्रदेशातला सांस्कृतिक ऱ्हास छापील शब्दांपलीकडचा आहे. नव्या पिढीला त्यात रसही नाही. मग त्यांना समजेल त्या – रुचेल त्या माध्यमातून सांस्कृतिक एकवाक्यता जोपासण्यासाठी 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' ही वेबसाइट तयार झाली आहे. दिनकर गांगल यांचे द्रष्टे संपादन तिला काळाबरोबर ठेवेल. 'रुची'त या अंकापासून 'थिंक महाराष्ट्र'ची चार पाने असतील. मराठी कर्तृत्व आणि सांस्कृतिक जागर यांच्याशी लिंक साधण्यासाठी ती साइट पसरायला हवी. तसाच प्रयत्न इ–संमेलनाद्वारे युनिक फीचर्सने केला आहे. त्याचा आढावा रमेश दिघेंनी घेतलाय.

विचार करण्यासाठीही स्थिरता लागते. तेव्हा स्पेस मिळते. ग्रंथालीने ती विविधांगांनी विचारांच्या रूपात दिली. आपण त्यात सहभागी होऊ शकता.

**– संपादक**

# ‘दीपस्तंभ’चे प्रकाशन

**प्रतिनिधी**

चित्रकार आणि कवी षांताराम पवार यांचं व्यक्तिदर्शन घडवणारे पुस्तक ग्रंथालीतर्फे प्रकाशित करण्यात आले. त्याचा प्रकाशन समारंभ रवींद्र नाट्य मंदिराच्या मिनी थिएरमध्ये १४ जानेवारी २०११ ला साजरा झाला. पवारांचे एकेकाळचे विद्यार्थी, मित्र आणि चाहते या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हजर होते. त्यात पुरुषोत्तम बेर्डे, नलेश पाटील, दत्तात्रय पाडेकर, अच्युत पालव, प्रभाकर कोलते, सुधीर पटवर्धन अशा अनेकांचा समावेश होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्ज्वलानाने झाली. त्या आधी पवारांच्या आयुष्यातल्या महत्त्वपूर्ण टप्प्यांची छायाचित्रे पडद्यावर दाखवण्यात आली. पार्श्वभूमीवर दीपस्तंभचा राखाडी रंगाचा मोठा लोगो सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होता. व्यासपीठावर षांताराम पवार, अध्यक्ष डॉ. रवी बापट आणि इतर वक्ते स्थानापन्न झाले. सुदेश हिंगलासपूरकर यांनी पुस्तकभेट देऊन त्यांचे स्वागत केले. सूत्रधार होते अजित भुरे.

दीपक घारे पवारांचे विद्यार्थी आणि ग्रंथालीचे प्रतिनिधी या नात्याने प्रथम बोलले. पवारांची शिकवण्याची पद्धत आदर्श शिक्षणपद्धतीच्या साच्यात बसणारी नव्हती, तरीही ते आदर्श शिक्षक होते; पवारांना आजूबाजूचे शिकवण्यात, तंत्रकौशल्या-पलीकडचे कलेबद्दलचे व्यापक भान आणून देण्यात अधिक रस होता असे सांगत दीपक घारे म्हणाले, ग्रंथालीच्या विविध उपक्रमांमध्ये, मग ती ‘बलुतं’सारख्या पुस्तकांची मुखपृष्ठ असोत अथवा ग्रंथयात्रांचे प्रसारसाहित्य असो, गांगलांनी पवारांना सहभागी करून घेतले, त्यांचे हट्टही पुरवले, कारण गांगलांना खात्री होती की पवार चांगले तेच देणार!



दिनकर गांगल षांताराम पवारांशी संवाद साधताना

नाटककार संजय पवार हे देखील पवारांचे विद्यार्थी. त्यांनी आपल्या हलक्या-फुलक्या शैलीत पवारांचे मोठेपण सांगितले. पवार सर पेज थ्रीवरचे सिलेब्रिटी झाले नाहीत यातच त्यांचे मोठेपण सामवलेले आहे. त्यामुळे आम्हालाही पाय जमिनीवर ठेवण्याची शिकवण मिळाली असे संजय पवार अभिमानाने म्हणाले. ‘कार्यकर्ता’ पुस्तकाच्या मुखपृष्ठासंदर्भात, रंगांना राजकीय अर्थ देण्याचे कलावंताचे स्वातंत्र्य आणि प्रकाशकाला पाळावे लागणारे वास्तवाचे भान संजय पवारांनी एका किश्श्यामधून नेमकेपणाने सांगितले.

सर ज.जी. उपयोजित कला-महाविद्यालयाचे माजी अधिष्ठाता प्रा. मं.गो. राजाध्यक्ष यांनी आपल्या आठवणींमधून पवारांचे व्यक्तिमत्व उभे केले. विद्यार्थी आणि सहकारी म्हणून राजाध्यक्षांना पवारांचा सहवास दीर्घकाळ लाभला. दामू केंकरे, षांताराम पवार यांच्यामुळे नाट्य-कलाक्षेत्रातील घडामोडींची एक समृद्ध जाणीव कशी तयार झाली आणि कलाप्रदर्शनांसाठी सातत्याने उत्तम दर्जाचे काम करण्याची प्रेरणा कशी मिळाली ते राजाध्यक्षांनी सांगितले. पवारांच्या चित्रनिर्मितीचा अनुभव प्रत्यक्ष पाहताना कसा रोमांचकारक असे ते दोन-तीन उदाहरणांमधून राजाध्यक्षांनी स्पष्ट केले.

इंद्रधनुष्याचे ओझे वाहणारे पवारांचे छायाचित्र असलेल्या भित्तिचित्राच्या निर्मितीचा किस्सा सांगून राजाध्यक्षांनी आपले मनोगत संपवले.

ज्या मेडिमिक्स साबणाची पवारांनी जाहिरातमोहीम यशस्वीपणे साकारली त्या मेडिमिक्सचे प्रमुख प्रदीप आवर्जून या कार्यक्रमास आले होते. प्रदीप यांनी पवारांशी जडलेल्या व्यवसायापलीकडील नात्याबद्दल सांगितले. दक्षिणेतून आलेल्या मेडिमिक्स साबणाचे मराठी संस्कृतीशी पवारांशी कसे नाते जोडले आणि मेडिमिक्स ब्रँडला जनमानसात कसे स्थान मिळवून दिले त्याचा प्रदीप यांनी गौरवपूर्वक उल्लेख केला. कलानिर्मितीतील दोषरहित परिपूर्णतेबद्दल कलावंत किती दक्ष असतो आणि स्वत:शी प्रामाणिक असतो याबद्दलची एक रूपककथा प्रदीप यांनी सांगितली. एका शिल्पकाराने दोन प्रचंड आकाराची शिल्पे बनवली. त्यापैकी एका शिल्पाकृतीमध्ये त्या शिल्पाच्या नाकावर एक बारीक ओरखडा होता. शिल्पे उभारल्यावर खालून हा ओरखडा लक्षात येण्याची सुतराम शक्यता नव्हती. पण त्या शिल्पकाराने सांगितले की हा ओरखडा मला सतत दिसत राहील!

अरुण साधू यांच्या हस्ते 'दीपस्तंभ' पुस्तकाचे प्रकाशन झाले. या पुस्तकासाठी लेख लिहिणाऱ्या लेखकांचा, संपादकांचा आणि चित्रकारांचा या प्रसंगी सत्कार करून त्यांना स्मृतिचिन्ह देण्यात आले. षांताराम पवारांच्या शाल व श्रीफळ देऊन त्यांच्या कन्या गौरी, गार्गी व गीताली यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला.

अरुण साधू आपल्या भाषणात म्हणाले की माझी आणि षांतारामची ओळख मित्र म्हणून झाली. बाकी सर्व जण त्याचा उल्लेख सर म्हणून करत असले तरी माझ्यासाठी तो षांतारामच आहे. साधू म्हणाले की कवितेतले काही न कळणारा मी माणूस, पण षांताराम त्याची कविता मला ऐकवायचा. त्याच्या त्या वाचनातून त्याची कविता मला कळायला लागली. षांतारामला जे.जे.मध्ये काम करताना, चारमिनार ओढताना पाहायला कधी मिळाले नाही याबद्दलची खंत त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रवी बापट. पवारांचे वडील हेसुद्धा पवारांप्रमाणेच कसे विलक्षण व्यक्तिमत्त्व होते आणि मेडिकल कॉलेजात विद्यार्थ्यांमध्ये पवारांच्या वडिलांनी कसे जवळचे नाते निर्माण केले होते याच्या आठवणी रवी बापटांनी जागवल्या. आपल्या खेळकर शैलीत कधी मुखपृष्ठावर भाष्य करत तर कधी पवारांशी व्यासपीठावरच संवाद साधत डॉ. रवी बापट यांनी पवारांबरोबरच्या आपल्या मैत्रीला उजाळा दिला.

यानंतर लगेचच दिनकर गांगल आणि षांतारम पवार यांच्यात रंगतदार संवाद झाला आणि या मुलाखतीत षांताराम पवार आपल्या नेहमीच्या शैलीत मोकळेपणाने बोलले. मी आयुष्यभर अनेकदा वाकडी वळणे पत्करली, प्रयोग केले. जरा काही चाकोरीबाहेरचे केले की गदारोळ माजतो. पण सर्जनशीलतेसाठी ते आवश्यक असल्याने लौकिक अर्थाने आयुष्य फुकट गेले तरी चालेल, पण मी चौकटीबाहेर जात राहणार असे पवारांनी ठासून सांगितले. पवारांच्या या मुलाखतीनंतर कार्यक्रम संपला तेव्हा सारेच जण षांतारामपर्वाच्या आठवणींमध्ये रंगलेले होते.

**प्रतिनिधी**

**'दीपस्तंभ' इ–बुक म्हणून उपलब्ध!**

पुस्तक प्रकाशनाच्याच दिवशी 'दीपस्तंभ' पुस्तक इ–बुक म्हणून www.bookganga.com वर उपलब्ध करून देण्यात आले. आता जगभर कुणीही ते ऑनलाईन विकत घेऊ शकतात.

प्रकाशन समारंभाच्या वेळी 'दीपस्तंभ' विकत घेणाऱ्यांना पुस्तकाबरोबर 'कविथा' संग्रह आणि 'ऋतुसंहार' प्रदर्शनाची राज शिंगे यांनी तयार केलेली सीडी भेट म्हणून देण्यात आली.





## चिं.त्र्यं. खानोलकर (ललित चरित्र)

**दीपक घारे**

चिं.त्र्यं. खानोलकर हे त्यांच्या साहित्याप्रमाणेच एक गूढ व झपाटून टाकणारं व्यक्तिमत्त्व होतं. प्रतिभेचं देणं लाभलेल्या खानोलकरांना उत्कटतेनं जगण्याची मोठी किंमत मोजावी लागली. त्या धडपडीचा समग्र अनुभव म्हणजे हे वेधक शैलीत लिहिलेलं चरित्र. खानोलकरांच्या साहित्याबद्दल ते कुतूहल निर्माण करतं. या साहित्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोण देतं. परिचितांनाही इथं खानोलकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही अज्ञात पैलू दिसतील!

**मूल्य १८० रु.   सवलतीत ११० रु.**

# ब्लेस यू माय चाईल्ड!

## निलू 'निरन्जना' गव्हाणकर

९६ साली चीनमधलं माझं काम संपल्यावर पूर्ण चीन भटकले. अगदी तिबेटलाही जाऊन आले. मनात विचार आला की भारत आपली जन्मभूमी असूनही आपण तो पूर्णपणे पालथा घातलेला नाही. तेव्हा चीनमधून परतल्यावर भारतात थांबून दोन महिने एकटीनं भरपूर भटकायचं ठरवलं. त्या भटकंतीत मी कलकत्त्याला दोन-तीन दिवस थांबायचं ठरवलं. रामकृष्ण परमहंसाचं ठिकाण व कालिमाता मंदिर पाहिल्यावर बेलूर मठ बघायला गेले आणि विवेकानंदांनी भारावलेलं माझं मन बेलूर मठाच्या प्रेमात पडलं. तेथून मला हलवेना. मग दुसऱ्या दिवशी मी परत बेलूरला गेले.

कलकत्ता सोडायचा दिवस उजाडला. एअरपोर्टवर दुपारी तीन वाजता पोचायचं होतं. तेव्हा टॅक्सी वगैरेची सोय करण्यासाठी मी हॉटेलच्या मॅनेजरशी बोलायला गेले. एकदम डोक्यात काय विचार आला कोण जाणे, मी त्याला विचारलं, ''सध्या मदर टेरेसा इथे आहेत का?''

''त्या इथे आहेत असं ऐकलं. कोणीही टॅक्सीवाला तुम्हाला तिथे पंधरा मिनिटांत पोचवेल.''

मॅनेजरनं मला तिथे जायचं कसं ही माहिती दिली होती म्हणून बरं, कारण टॅक्सीवाला बिहारी निघाला, त्याला बंगाली भाषा येत तर नव्हतीच, पण मदर टेरेसा कोण हेसुद्धा त्याला माहिती नव्हतं. मग मीच पत्ता शोधून काढला. सकाळचे दहा वाजले होते. प्रवेशद्वारातून आत शिरताच एका सिस्टरनं मला थांबवून विचारलं, ''तुम्हाला काय हवं आहे?''

''मदर टेरेसा इथे आहेत असं ऐकलं. त्यांची प्रकृती बरी आहे ना? त्यांचं दर्शन लांबून का होईना पण व्हावं अशी इच्छा होती.''



''आता ते शक्य नाही कारण मदर टेरेसा झोपल्या आहेत.''

माझ्या तोंडावरचे भाव (दहा वाजता!) बघून, सिस्टरना मजा वाटली असणार, कारण त्या स्मितहास्य करून म्हणाल्या, ''आज परदेशी महत्त्वाचे पाहुणे आले होते आणि मदर टेरेसा सकाळी तीन वाजल्यापासून फार बिझी होत्या. शिवाय, हल्ली त्यांची प्रकृती बरी नसते. त्या फारच दमल्या होत्या. त्या दररोज दुपारी बारा वाजता प्रार्थना करतात. त्यावेळेस लोक त्यांच्या दर्शनासाठी जमतात. त्यावेळी तुम्हाला यायलां जमलं तर या.''

मी त्यांचे आभार मानून परत हॉटेलवर आले. मॅनेजरनं लगेच मदर टेरेसा दिसल्या का म्हणून उत्सुकतेने विचारलं. मी त्याला सर्व हकीकत सांगितली. घामानं डबडबलेल्या माझ्या तोंडाकडे बघत तो म्हणाला, ''बारा वाजता तुम्हाला हॉटेल सोडायला पाहिजे, पण काळजी करू नका. तुम्ही इतक्या लांबून आलात, तेव्हा तुम्ही मदर टेरेसांच्या दर्शनाला जरूर जा. तुम्हाला मी खोली वेळेवर खाली केली नाही म्हणून आणखी पैसे लावणार नाही.'' त्यानं स्वत:हून इतका चांगुलपणा दाखवला म्हणून मी त्याचे मनापासून आभार मानले. मी परत टॅक्सीनं 'सिस्टर्स ऑफ चॅरिटी'च्या संस्थेच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ पोचले. बाराला काही मिनिटं होती आणि प्रार्थना हॉलच्या जवळ काही लोक जमलेले दिसले. मी पण त्या घोळक्याजवळ जाऊन जरा कोपऱ्यात उभी राहिले.

इतक्यात लोकांत कुजबूज सुरू झाली. मदर टेरेसा चिंचोळ्या गॅलरीतून आत प्रवेश करत होत्या. गॅलरीला लागूनच एक काउंटर होता. त्यावर जुन्या पद्धतीचा काळा फोन होता. मदर टेरेसांना फोन आला होता. त्यामुळे आम्हा सर्वांपासून त्या फक्त तीस फुटांवरच फोनवर बोलत उभ्या राहिल्या. त्यांची नेहमीची ठरलेली निळी किनार असलेली पांढरी सुती साडी त्या नेसल्या होत्या. त्या अगदी लहानखोऱ्या आकाराच्या दिसल्या. उंची पाच फुटांपेक्षा कमी. अनवाणीच होत्या. आपण घरात साध्या सपाता घालतो, तशाही त्यांनी घातल्या नव्हत्या. मनात विचार आला, देवाची प्रार्थना करताना चपला न घालण्याची हिंदू पद्धत त्यांनी स्वीकारली

असावी. फोनवर बोलत असताना, आपण दृष्टी कोठेतरी स्थिरावतो तशी त्यांनी त्यांची दृष्टी माझ्यावर स्थिरावली होती. त्यांचं बोलणं झाल्यावर त्यांनी फोन ठेवला व प्रार्थना हॉलच्या दिशेनं न जाता, त्या सरळ माझ्या दिशेनं चालत आल्या. त्यांच्या डाव्या हातात एक पिवळसर कव्हर घातलेलं पुस्तक होतं. बहुतेक बायबल असावं. त्यांनी माझ्या डोक्याला स्पर्श करत, त्यांच्या जड युरोपीय उच्चारात खालच्या पट्टीच्या आवाजात म्हटलं, ''ब्लेस यू माय चाईल्ड''.

मी एकदम गडबडून गेले. आता मी काय करायचं? 'थँक यु मदर' म्हणायचं, नमस्ते करायचं की पाया पडायचं? मी घुटमळलेली पाहून त्यांनी परत माझ्या डोक्याला स्पर्श करून म्हटलं, ''ब्लेस यू माय चाईल्ड'', मी पुसटसं 'थँक यु मदर' असं काहीतरी पुटपुटले. तशा त्या थोड्या पुढे झाल्या. त्यांनी एक-दोन लहान मुलांच्या डोक्याला स्पर्श करून त्यांना आशीर्वाद दिला. काही बायका त्यांच्या पाया वगैरे पडल्या. मदर टेरेसा एकदम परतून माझ्यासमोर आल्या, परत त्यांनी माझ्या डोक्याला स्पर्श करून आशीर्वाद दिला. मी तर एकदम चक्रावूनच गेले. हा काय प्रकार आहे? मग त्यांनी माझ्या हाताला धरून प्रार्थना हॉलच्या दिशेनं चालायला सुरुवात केली. त्यांच्या मागोमाग मी गेले. अर्थात हॉलच्या बाहेर मी चपला काढायला विसरले नाही.

प्रार्थना हॉल साधारण चाळीस फूट लांब, पंधरा फूट रुंद असा लांबुडका होता. जमीन लाल कोब्याची असावी कारण पायाला तिचा थंडावा जाणवला. दूर कोपऱ्यात दोन सिस्टर जमिनीवर बसून प्रार्थनेत मग्न होत्या. दरवाजाजवळ भिंतीला लागून एक लहानशी जुनाट खुर्ची होती आणि तिच्या बाजूला एक लहानसं अरुंद लाकडी बाकडं होतं. बसं एवढंच फर्निचर. त्या लहानशा खुर्चीत बसता बसता त्यांनी परत माझ्या डोक्याला स्पर्श करून पुटपुटत आशीर्वाद दिला आणि त्यांच्या डोळ्यांतून मला बाकड्यावर, त्यांच्या खुर्चीच्या शेजारी बसण्याची सूचना मिळाली. माझ्यासारखी जाडीजुडी बाई त्या बाकड्यावर बसणं म्हणजे त्या बाकड्यावर अत्याचारच होता. त्यांनी हातातलं पुस्तक उघडून वाचायला सुरुवात केली. पुस्तक वाचता वाचता त्या अधुनमधून माझ्याकडे बघत होत्या व क्रॉसकडे बघत होत्या. त्यांचं वाचन पंधरा मिनिटं चाललं होतं. तोपर्यंत मी त्यांच्या शेजारी शांतपणे बसले. मला उदात्त वगैरे वाटलं नाहीच, पण मी भारावूनही गेले नाही. परंतु मनात पूर्वी कधीही न अनुभवलेली शांतता एकदम वाटली हे खरं.

त्या खुर्चीवरून उठता उठता त्यांनी परत माझ्या डोक्याला स्पर्श करून आशीर्वाद दिला. आता हे फारच झालं असं मला वाटलं. मनात विचार आला की अठ्ठ्याहत्तर साली, रात्री मी झोपले असताना, चोरांनी माझ्यावर अघोरी हल्ला केला होता. त्या चोरांनी माझ्या डोक्यावर हातोड्यांनी घातलेल्या घावांमुळे मृत्यूच्या दारात जाऊन मी परत आले. हे सर्व मदर टेरेसांना त्यांच्या आंतरिक शक्तीमुळे कळलं असेल का? कारण त्यांनी परत परत माझ्या डोक्याला स्पर्श करून आशीर्वाद देणं मला जरा विचित्रच वाटलं. मी चूपचाप त्यांच्यामागून बाहेर आले. दाराबाहेर दोन सिस्टर मदर टेरेसांची वाट बघत उभ्या होत्या. आधी दर्शनाला जमलेले लोक निघून गेले होते. मदर टेरेसा एकदम माझ्याकडे वळल्या आणि त्यांनी प्रश्न विचारला.

''तू कोणत्या चांगल्या कार्यात गुंतली आहेस का?''

''छोट्या मोठ्या चॅरिटीत गुंतले आहे. परंतु बरीच वर्षं बाबा व साधनाताई आमटे ह्यांच्या सान्निध्यात आहे.'' मी नम्रतेनं उत्तरले.

त्या स्मितहास्य करत म्हणाल्या, ''मला वाटलंच. बाबा आमटे ह्यांच्या कार्याची मला माहिती आहे. चांगलं कार्य.'' दोन क्षणांची शांतता. मग त्या एकदम म्हणाल्या, ''तुला फोटो काढायचाय का?''

आता मात्र मी खलासच झाले. पर्समधून मी माझा कॅमेरा काढला. फिल्मवर फक्त एकच फोटो उरला होता. मी त्यांचा फोटो काढणार तशा त्या म्हणाल्या, ''नाही, नाही, तू माझ्याजवळ ये व सिस्टर आपल्या दोघींचा फोटो काढतील.''

मी आता तर पुरी चक्रावूनच गेले होते. मी कॅमेरा एका सिस्टरच्या हातात दिला. परंतु मदर टेरेसांच्या जवळ जाऊन उभं राहणं मला योग्य वाटेना. माझा संभ्रम बघून दुसऱ्या सिस्टर म्हणाल्या, ''जा, त्यांच्याजवळ जा, असाच त्यांचा आग्रह आहे.'' असं म्हणत म्हणत माझ्या खांद्याला स्पर्श करून त्यांनी मला मदर टेरेसांच्या जवळ केलं. आमचा फोटो काढल्यावर मी मागे वळून आमच्या पाठीमागच्या काळ्या फळ्यावर पांढऱ्या खडूनं काय लिहिलं होतं ते वाचलं. "Meeting of the Soul's Day" November 2, 1996.

जेव्हा मी मदर टेरेसा आणि दोन सिस्टरांचा निरोप घेतला, तेव्हा मदर टेरेसांनी परत आशीर्वाद दिला. संस्थेच्या इमारतीतून बाहेर निघताना पाय जरा रेंगाळले आणि मनात विचार आला, मदर टेरेसांशी आज अपॉईंटमेंट घेतल्याशिवाय मला त्यांच्या सान्निध्यात पंचवीस मिनिटं मिळण्याचा हा योगयोगच म्हणायचा. माझा ह्या संस्थेचा पूर्वी कधी संबंध नव्हता, पुढे बहुतेक कधी येणार की नाही माहिती नाही. परंतु आयुष्यात एक अविस्मरणीय चांगली गोष्ट घडली हे खरं.

पुढच्या आयुष्याला पुरण्यासाठी त्यांच्या सहा आशीर्वादांची शिदोरी मी काळजीपूर्वक मनात बांधून घेतली. नऊ महिन्यांनंतर मदर टेरेसा देवाघरी गेल्याची दुःखद बातमी अमेरिकेत टीव्हीवर परत परत दाखवली जात होती. मी मात्र मनात "Meeting of the Soul's Day" ची आठवण काढत, माझ्या मनातल्या शिदोरीची गाठ चाचपडत राहिले.

**निलू निरन्जना गव्हाणकर**
U_S_A_9@yahoo.com
nilugavankar@gmail.com

# चार दिवस, चार जिल्हे, चार तऱ्हा...

## दिनकर गांगल

नांदेडजवळच्या माळेगाव येथील यात्रेत प्राण्यांचा बाजार भरतो. तेथे राजस्थानातले उंटवाले उंट विकायला आणतात. गंमत अशी, की उंट खरेदी करणारेदेखील राजस्थानातून येतात; व्यवहार मात्र परंपरेने महाराष्ट्रात या ठिकाणी होतो! नांदेडचे इतिहासप्रेमी छायाचित्रकार सुरेश जोंधळे हा किस्सा सांगत होते. ते त्या परिसरातील वारसावास्तू जपण्याच्या मागे लागले आहेत. त्यांनी त्याकरता इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अॅण्ड कल्चरल हेरिटेजची शाखा नांदेडमध्ये काढली आहे. त्यांची उत्तमोत्तम प्रकाशने आहेत. इतिहासाचे अभ्यासक प्रभाकर देव व अन्य यांची त्यांना साथ आहे.

परभणीचे पेडगावकर यांच्याकडे जुन्या हस्तलिखितांची वीस हजार पाने आहेत. ती शास्त्रीय पद्धतीने जपली जावीत म्हणून ते गेली पाच वर्षे सरकारदरबारी खेटे घालत आहेत, पण निष्फळ!

अंबाजोगाईचे अभिजित जोंधळे आणि चित्रकार गणेश कदम, तेथील लेण्यांमध्ये सांडपाणी सोडले जाते या घटनेने व्यथित असतात; ते जमेल तेव्हा विद्यार्थ्यांना तेथे घेऊन जातात, साफसफाई करतात, पण तेथे उकिरडा, दलदल होणे काही थांबत नाही.

लातूरचे निवृत्त शिक्षक विजय धबडगावकर यांच्याकडे तेथील स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेची कार्यसूत्रे आली आहेत. त्यांनी मालेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न चालवला आहे; पण त्याहून त्यांचे खरे संस्कृतिप्रेम यात आहे, की लातूरमध्ये जे जे सामाजिक-सांस्कृतिक समारंभ होतात त्यांच्या पाठीमागे ते व त्यांचे साथीदार अतुल देऊळगावकर बळ लावतात. 'एकमत'ला संपादक म्हणून शरद कारखानीस तेथे आल्यानंतर तर त्यांना अधिक उत्साह लाभला आहे.



केरवाडीच्या डिस्कव्हरी सेंटरचा पोलादी तंबू

किती वेगवेगळी माणसे किती वेग-वेगळे प्रश्न घेऊन किती सच्च्या समाजप्रेमाने जगत असतात! झटत असतात! महाराष्ट्रात सर्वदूर जिल्हा-गावांत अशी गुणी माणसे पसरली आहेत. कोणी प्रज्ञा-प्रतिभेचे काम करतो तर कोणी चांगुलपणाचे-समाजसेवेचे. अशा कामांची व ती करणाऱ्या व्यक्तींची नोंद करत जावे; त्याबरोबर संस्कृतीच्या खुणा टिपाव्यात असा घाट 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' या वेबसाइटने घातला आहे. या संकल्पाभोवती माधव शिरवळकर, अतुल तुळशीबागवाले, भूषण केळकर, ज्योती शेट्ये, आदिनाथ हरवंदे, प्रमोद शेंडे, राम कासार, विश्वनाथ खांदारे, पद्मा कऱ्हाडे, राजेंद्र शिंदे, विदूर महाजन, मंगेश कीर्तने अशी माणसे जमा होत गेली. लेखन तर आणखी अनेक करू लागले. व्यक्तिगत पातळीवर रुजलेली कल्पना समूहाची झाली. तिला अधिक समर्थ प्रतिसाद लाभला तो महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) यांच्याकडून. फाउंडेशनच्या सुनंदा माने व सुनीता धुमाळे म्हणाल्या, की हे तर तुम्ही आमचे काम करत आहात! शिरवळकर यांच्या पूजा सॉफ्ट टेक्नॉलॉजीने पहिले सहा महिने वेबसाइटचा पूर्ण तांत्रिक खर्च केला. दरम्यान, ही वेबसाइट चालवण्यासाठी व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन नावाची ना नफा संस्था निर्माण करण्यात आली आहे. त्यासंबंधीच्या औपचारिकता पूर्ण होत आहेत.

वेबसाइट हे आजचे माध्यम आहे. त्यामुळे नवनवीन वेबसाइट्स दररोज निघत असतात. त्या साभांळणारे तांत्रिक लोक मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षित होत आहेत, परंतु बहुतेक साइट्स आशयाच्या बाजूने कच्च्या दिसतात - माहिती अपुरी असते, अचुकतेचा-सर्वांगीणतेचा आग्रह नसतो, त्या नियमित अपडेट केल्या जात नाहीत, मग प्रेक्षक रोडावतात. साइट्स ओस पडतात. वेब जर्नालिझमचे अभ्यासक्रम असण्याची गरज जाणवते. काही साइट्स/ब्लॉग्ज व्यक्तिगत मतप्रदर्शनार्थ चालवले जातात, ते चटपटीत असतात व त्यांचा प्रत्येकाचा पक्का वाचकवर्ग काही काळ राहतो. महाराष्ट्रासंबंधी प्रातिनिधिक, नियमित चालवल्या जाणाऱ्या चार-पाच वेबसाइट्स आहेत, परंतु त्या पाहून-वाचून मराठी मनाला दिलासा मिळू शकतो. वेबसाइट या माध्यमाची ताकद ओळखल्याची जाण असल्याचा प्रत्यय तेथे येत नाही.

वेबसाइट माध्यमाचे सामर्थ्य आहे तिच्या लोकशाही स्वरूपात. लोकशाही म्हणजे लोकांना आवाहन करून त्यांची लेख-पत्रे मागवणे नव्हे. ते तर वर्तमानपत्रे करत असतात व त्यांची दुसऱ्या दिवशी रद्दीही होते. 'थिंक महाराष्ट्र'वर विकेंद्रीकरण साधण्याचा प्रयत्न आहे. समाज घडतो तो सर्वसामान्यांमधील कर्तृत्वाने; महाराष्ट्राचे सामर्थ्य आहे ते येथील चळवळींचे-समाजसेवा वृत्तीचे; आणि सगळयात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील संस्कृतिसंचिताची जाणीव... गेल्या दोन-अडीच हजार वर्षांत - सातवाहनांपासून शिवाजीराजे व अलिकडचा प्रबोधनकाळ येथपर्यंत - हा समाज कसा घडत गेला? तो घडवणाऱ्या प्रेरणा कोणत्या? भौगोलिक परिस्थिती पूर्णत: वेगवेगळी असून पाच प्रदेश एकभाव कसे झाले? प्रथा कशा पडल्या-परंपरा कशा निर्माण झाल्या? अनेक प्रश्न. महादेवशास्त्री जोशी यांनी संस्कृतीच्या अशा हकिगती मिळवून एकहाती संस्कृतिकोश तयार केला. तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक माहितीसाठी मानदंड ठरला.

काळ बदलला, समाज जागा झाला, तळापर्यंत शिक्षण पोचले, तंत्रविज्ञान आले, स्थलांतर वाढले, समाज संमिश्र बनला, पण त्यामुळे 'मूळ' जाणण्याची ओढ प्रकर्षाने जाणवू लागली. आपल्या प्रदेशाची-आपल्या गावची ओळख करून घेण्याची आच तयार झाली. विशेषत: आपल्या मुलाबाळांसाठी हे फार गरजेचे आहे असा भविष्यवेध लागला.

'थिंक महाराष्ट्र'ने ही भावना जपण्याचे ठरवले. ग्लोबल वातावरणात हे स्थानिक वैशिष्ट्य अधिक महत्त्वाचे आहे - कारण ते मनाला आधार देणार आहे. वेबसाइटच्या माध्यमात हे शक्य आहे. आपली अस्मिता जपायची आणि सगळ्या जगाशीही जोडले जायचे; अगदी व्यक्तिगत आवडीनिवडी-देखील सांभाळायच्या तरी जगभरच्या रीती जाणून घ्यायच्या. यामुळे मार्केटिंगमधून तयार होणाऱ्या सरधोपट संस्कृतीला छेद मिळतो. मुख्यत: टेलिव्हिजनने निर्माण केलेले तेच ते एका छापाचे हिरो-हिरॉइन, रिॲलिटी शोजमधून होणारे संस्कृतीचे ढोबळ दर्शन (अप्सरा आऽली!) यांची मजा चाखायची, त्यातून जिवाची करमणूक करून घ्यायची, परंतु आपल्या सभोवतीच्या सत्याचा शोध चालू ठेवायचा ही जी सुसंस्कृत, सुबुद्ध मानवी जीवनाची गरज आहे ती अबाधित राहू शकते; मनुष्यजीवनाला अर्थ शिल्लक राहू शकतो. ग्लोबल व लोकल यांची 'ग्लोकल' अशी अर्थपूर्ण सांगड घालता येऊ शकते.

या एवढ्या मोठ्या, व्यापक, तात्त्विक उद्दिष्टापर्यंत पोचण्यासाठी साधी आवश्यकता आहे ती गावोगावच्या वैशिष्टचपूर्ण माहितीची - गाव घडले कसे? तेथील प्रथा-परंपरा कोणत्या? ग्रामदेवता-तिची जत्रायात्रा? गावातल्या 'छांदिष्ट', 'वेड्या' व्यक्ती - त्याच समाजाचा आधार असतात! गावजीवनाचे वेगवेगळे पैलू... इतक्या अनंत गमती असतात. पूर्वीच्या मुंबईत लालबाग-परळ-नायगाव भागात त्यांचा प्रत्यय येई. कोणत्या तरी विशिष्ट दिवशी विशिष्ट खेड्यातले मुंबईभर विखुरलेले शंभर-सव्वाशे लोक तेथे एकत्र येत, पालखीत देव असे, त्यांची विशिष्ट वाद्ये असत. भजनांची वेगळी रीत असे. हे वर्षातले अनेक दिवस चालत आहे असे जाणवे. मनात येई, हे लोक एकत्र कसे जमतात? कोण-कोणाला-कसा निरोप देतो? जरा अधिक निरखल्यावर त्यांच्या एकजीव असण्याची, त्यांच्या सांस्कृतिक बीजशक्तीची जाणीव होई.

संस्कृती माणसांना एकत्र बांधून ठेवते, एकात्म बनवते. पं. नेहरूंपासून अनेक जाणकारांनी भारताच्या सांस्कृतिक विविधतेची वर्णने केली आहेत. ती ढोबळ आहेत. काही इतिहासकार अधिक तपशिलात गेले आहेत. परंतु गेल्या काही दशकांत समाज जसा जागा होत गेला तशी त्यांतील सांस्कृतिक वैशिष्ट्ये सूक्ष्म रूपात प्रकट होऊ लागली आहेत. मार्केटिंगच्या जमान्यात ती झपाट्याने रगडली जाऊन एकाच चेहऱ्याची होऊ लागली आहेत, ही खंतही सर्वांना आहे. अशी विविधता टिपण्यासाठी तशीच विकेंद्रित रचना हवी. हेच ध्यानी घेऊन महाराष्ट्रात तालुकावार सांस्कृतिक माहिती देऊ शकणाऱ्या (खरे तर, आणखीही तळात जायला हवे) 'संस्कृतिसेवकां'चे जाळे तयार करावे या हेतूने पूर्ण राज्याचा दौरा करण्याचे योजले. महाराष्ट्रात साडेतीनशेहून अधिक तालुके आहेत. तेथील सांस्कृतिक कार्यकर्त्यांचे नेटवर्क बांधले गेले तर स्थानिक माहितीचा मोठा खजिना निर्माण होऊ शकेल असा अंदाज आहे.

दौऱ्याचा पहिला टप्पा ठरवला तो चार जिल्ह्यांचा. परभणी-नांदेड-अंबाजोगाई (बीड) आणि लातूर. चार दिवस हाताशी होते. रोज एक जिल्हा. बरोबर होते केरवाडी-परभणीचे सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत कुळकर्णी, मुंबईचे स्वेच्छानिवृत्त बँकअधिकारी विजय नाडकर्णी आणि ट्रेकिंग व संगीत यांची साथ सांभाळणाऱ्या ज्योती शेट्ये. प्रत्येक ठिकाणी, जाणकारांची बैठक होई व सायंकाळी छोटी जाहीर सभा.




**लातूरच्या प्रेस क्लबने आयोजित केलेले गांगले यांचे भाषण.
सोबत बसलेले सूर्यकांत कुळकर्णी व धबडगावकर**

त्यावेळी वेबसाइटची झलक पडद्यावर दाखवण्यात येई.

चार दिवसांत चार ठिकाणच्या साधारण चारशे लोकांना भेटणे झाले. त्यांच्या नानाविध कथा-कल्पना ऐकायला मिळाल्या. महाराष्ट्राच्या स्थापनेला पन्नास वर्षे पूर्ण झाली, सुवर्ण महोत्सवानिमित्त अशा उपक्रमाची गरज सर्व मंडळींना विशेषत्वाने जाणवलेली दिसली. प्रत्येक ठिकाणी वेग-वेगळ्या स्वरूपाच्या हकिगती-किस्से पुढे येत. नांदेडला उपड्या घमेल्यावर मांडे कसे भाजले जातात इथपासून, जोशी-पाटोदेकर यांनी शहरामध्ये वॉर्डावॉर्डात व ग्रामीण भागात रोजगारहमीवर कशी जागृती व निकोप प्रथा निर्माण केल्या आहेत यांची माहिती सांगितली गेली. परभणीचे ॲड. वसंत पाटील यांनी तेथील संगीताची अभिरुची संस्कारित करत हजारभर 'कानसेन' तयार केले. अंबेजोगाईच्या नूतन मराठी विद्यालयाने आपल्या अमृतमहोत्सवा-निमित्त दर रविवारी विज्ञानशिबिर संयोजित केले आहे आणि लातूरच्या संजय कांबळेने कचरावेचक मुलांचे गट तयार केले व त्यातून त्यांना लाभलेली नवी दृष्टी... हा तर नुसता मासला होता. प्रत्येक जिल्ह्यातील तालुका-वार जग उलगडत जाईल त्याची तोड 'विश्वरूप दर्शना'शी होऊ शकेल अशीच प्रचीती.

दोन प्रयोग मुद्दाम नमूद करावेसे वाटतात. त्यामधून समाज सच्च्या गोष्टी अल्प खर्चात कशा घडवत असतो याचे दर्शन होते. नांदेडचे डॉ. सुरेश खुर्सेवाले यांचे रयत रुग्णालय. ते डॉक्टर व नागरिक यांच्या सहभागी व्यवस्थापनातून उभे राहिले आहे. रुग्णांना त्यांच्या गरजेप्रमाणे रास्त दरात उपचारसेवा लाभली पाहिजे हा डॉक्टरांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा आग्रह आहे. तेथे रुग्ण तपासणी फी फक्त चाळीस रुपये, औषधे 'लो कॉस्ट'ची आणि शस्त्रक्रियेचे कमाल पाच हजार रुपये अशा खर्चात सेवा मिळू शकतात. हे आकडे कमीजास्त होत राहतील, परंतु त्यामागील सेवेची वृत्तिभावना अमर आहे! सूर्यकांत कुळकर्णी यांनी मुलांसाठी कल्याणाचे व हक्काचे बरेच काम केले. ते विविध प्रकारे केले. त्यांनी या मुद्यावर सरकारला सतत हलवत ठेवले; परंतु मुले मोठी झाली व हाताशी आली तेव्हा त्यांनी गेल्या दोन वर्षांत केरवाडी येथे 'डिस्कव्हरी सेंटर' उभे केले आहे. ते पाहून मी अचंबित झालो. हा स्टील स्ट्रक्चरचा सर्कसएवढा मोठा, ऐसपैस तंबू आहे. तेथे मुलांसाठी खेळणी आहेत. तेथे मुलांनी दिवसभर रमायचे असते. पण खात्रीने सांगतो, की मुलांइतकीच पालकांनी तेथे रमण्याची गरज आहे. माणसाची जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाईल. त्याला आपल्याला बुद्धी असून तिला प्रश्न पडू शकतात याची जाणीव होईल.

मदर टेरेसा व बंग-आमटे यांची शिखरे उभी करून समाजातल्या तशा छोट्यामोठ्या उपक्रमांना उपेक्षित ठेवणे म्हणजे समाजातील कर्तृत्वभावना खच्ची करणे होय. व्यक्तिगत पातळीवर कोणतेही भले काम करणाऱ्या माणसांना-त्यांच्या संस्थांना सध्या समाजात एकाकी पडल्यासारखे वाटते. त्यांच्यामध्ये दुवा निर्माण होण्याची गरज आहे. 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' या वेबसाइटचा तो प्रयास आहे. त्यावरील मजकुराचे स्वरूप सध्या मुंबई-पुणे-नासिक केंद्री आहे. क्वचित नागपूर-अमरावती-कुरुंदवाड यांचे दर्शन होते. पण महाराष्ट्राची विकेंद्रित स्वरूपात, खोलात जाऊन सच्ची माहिती मिळवणे गरजेचे आहे. ती स्थानिकांनी जमवणे व वस्तुनिष्ठ स्वरूपात सादर केल्याने त्यास सामाजिक मान्यता लाभेल व विवादाचे प्रसंग कमी येतील.

सरकार यापुढे फार बऱ्या गोष्टी करू शकणार नाही. त्या यंत्रणेच्या त्या मर्यादा आहेत. समाजाने पुढे येऊन चांगल्या गोष्टी आरंभल्या तर सरकारची साथ मिळू शकेल. पन्नास वर्षांपूर्वी स्थापन झालेला महाराष्ट्र सुदृढ व एकात्म ठेवायचा असेल तर जनतेने पुढाकार घ्यायला हवा व संयुक्त महाराष्ट्राच्या धर्तीचे नवे आंदोलन उभारावे असा मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार यांचा मानस असतो. ते सत्यही आहे, परंतु त्यासाठी महाराष्ट्राच्या विविधतापूर्ण संस्कृतीची तपशीलवार माहिती हवी. ती मिळवुया. ज्यांना ज्यांना संस्कृतिसंचित नोंदण्याच्या या प्रयत्नात सहभागी होण्याची इच्छा आहे, त्यांनी संपर्क साधावा-

**संपर्क :** संपादक, थिंक महाराष्ट्र डॉट कॉम
द्वारा, पूजा सॉफ्ट हाऊस
यू/१२८, कालिमाता मंदिराजवळ,
सेक्टर-४, ऐरोली, नवी मुंबई-४०० ७०८
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
Email : thinkm2010@gmail.com

# हे घडेल का महाराष्ट्रात?

## माणिक मुंढे

झोप झालेली नसते त्यावेळेस अहमदाबाद येतं. सकाळ काहीशी निळसर वाटते, थांबल्यासारखी. दिवस उजाडण्यापूर्वी भरून राहिलेलं एक निशब्द जग. अहमदाबादला उतरतो, घ्यायला गाडी आलेली असते. मला गांधीनगरला जायचं असतं. गाडीत बसतो. अहमदाबाद रेल्वे स्टेशनवर कायम गर्दी असते. काही जण अजूनही झोपेतच असतात. पण गाडी गांधीनगर रस्त्याला लागली की शहर भर्रकन संपल्यासारखं वाटतं. शहरात कुठेही राजकीय पक्षांच्या नेत्यांची होर्डिंग नाहीत, की ज्यामुळे सकाळी सकाळी त्यांच्या मुंडक्यांचे फोटो पाहावे लागतील. मोदींचीही कुठे होर्डिंग दिसत नाहीत. अहो आश्चर्यम्!

अहमदाबाद कुठे संपतं आणि कुठे गांधीनगर सुरू होतं हे लक्षात येत नाही. पण गाडी चकाचक रस्त्यांना लागली, ट्रॅफिकचे साईन बोर्ड सगळे जिथल्या तिथं दिसले, थोडीशी झाडी दिसायला लागली, स्वच्छ चौपदरी रस्ता लागला की आपण गांधीनगरमध्ये असल्याचं ओळखायचं. माझी आणखी एक खूण- गाडीनं नर्मदेचा पाण्यानं भरलेला कॅनॉल ओलांडला की गांधीनगरमध्ये पोचल्याची पक्की खूण पटते. मला ही जास्त जवळची वाटते, कारण हे शांतपणे वाहणारं पाणी सातपुड्याच्या डोंगरात पडलेलं असेल ज्यानं गुजरात समृद्ध होतोय.

गांधीनगर हे राजधानीचं शहर. पण गुजरातची आर्थिक राजधानी अहमदाबादच. सगळे बाजार, व्यवहार अहमदाबादमध्येच. काही मोठी खरेदी करायची झाली तरी गांधीनगरहून अहमदाबादलाच आलेलं बरं. वीस किलोमीटर, पाऊण तासाचा रस्ता. अहमदाबाद-गांधीनगर म्हणजे जुळी शहरं. सिकंदराबाद-हैदराबाद किंवा पुणे-पिंपरी-चिंचवडसारखी.

जशी अहमदाबादमध्ये कुठल्या पक्षाची पोस्टर दिसत नाहीत तशी गांधीनगरमध्येही नाहीत. ना काँग्रेस, ना भाजपा, ना नरेंद्र मोदी. गेल्या तीनएक महिन्यांपासून माझी कधी महिन्याला तर कधी पंधरा दिवसांत मुंबई-अहमदाबाद-गांधीनगर अशी फेरी असते, होत राहतील. आमचं एक घर सध्या गांधीनगरमध्ये आहे.

गांधीनगरला होणाऱ्या चकरांनी माझ्यात सर्वात मोठा बदल कुठला झाला? मला वाटतं, नरेंद्र मोदींबाबत माझं मत पूर्णपणे बदललं. मत बनवण्याची माझी एक पद्धत आहे. कुणी कितीही सांगितलं तरी इतरांच्या सांगण्यावरून माझं मत बनत नाही. एक तर प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा प्रयत्न करतो किंवा मग सारासार विचाराची फूटपट्टी लावतो. मोदींबाबतही तसंच.

मोदींबाबत पाच-सहा वर्षांपासून उलटसुलट बरंच काही ऐकून झालंय. त्यामुळे नैसर्गिकरीत्या एक प्रतिमा डोक्यात तयार झाली. गुजरात दंगे घडवणारे मोदी. ते वास्तव आहेच. ते मोदीही नाकारणार नाहीत. पण तरीही मी मोदींच्या नेतृत्वानं भारावलोय.

गुजरातमध्ये सध्या व्हायब्रंट गुजरात समिट सुरू आहे. हे पाचवं जागतिक संमेलन. जवळपास ऐंशी देशांतून उद्योगपती गांधीनगरला तीन दिवसांसाठी एकत्र आलेत. गुजरातच्या विविध भागांत गुंतवणूक होण्यासाठी मोदींनी सुरू केलेलं हे संमेलन दरवर्षी भरतं. एका व्यासपीठावर येण्याचं टाळणारे अंबानीबंधू मोदींच्या दोन्ही बाजूंना बसलेले दिसतायत. एवढंच नाही तर टाटा, गोदरेज, महिंद्र ही मंडळीही व्यासपीठावर आहेत. त्यांच्यासोबत देशोदेशीचे उद्योगपती गुजरातच्या गुंतवणुकीवर चर्चा करतायत. मोदींना हे जे जमलंय ते केंद्राला तरी जमेल?

गुजरात हे उद्योगी लोकांचं राज्य आहे. इथले लोक रेल्वेत टक्क्यांच्याच गप्पा मारतात हा माझा अनुभव. पण मोदी फक्त व्यापाऱ्यांचंच हित सांभाळतात का? नाही. मोदींनी गेल्या काही काळात राबलेल्या काही भन्नाट आयडिया त्याचा पुरावा. काही आठवड्यांपूर्वी गेलो होतो त्यावेळेस तिथं मोदींच्या 'स्वागतम्'ची चर्चा सुरू होती. मी थोडीशी माहिती घेतली आणि अवाक् झालो.

स्वागतम्ची आयडिया अशी. समजा, तुमचं एखादं काम भूमी अभिलेख कार्यालयात आहे आणि तिथला अधिकारी ते करत नसेल तर ते काम घेऊन तुम्ही 'तालुका स्वागतम'मध्ये जायचं. तहसिलदार दर्जाच्या किंवा वरिष्ठाकडे तक्रार द्यायची. समजा, त्यानंही काम नाही केलं तर 'जिल्हा स्वागतम'मध्ये जिल्हाधिकाऱ्याकडे जायचं. जिल्हाधिकाऱ्यानंही तक्रारीची दखल घेतली नाही तर मोदींकडे जायचं. 'मोदी स्वागतम'मध्ये आलेल्या तक्रारी संबंधित विभागांकडे पाठवल्या जातात. संबंधित अधिकाऱ्यांसह राज्यभरातले जिल्हाधिकारी, एसपी मोदींसमोर लाइव्ह असतात. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे दर काही महिन्यांनी 'सीएम स्वागतम्' असतंच.

तक्रारदाराला मोदी शेजारच्या खुर्चीवर बसवतात आणि संबंधित अधिकाऱ्याला जाब विचारतात, का रे बाबा, या व्यक्तीचं काम का नाही झालं? अधिकाऱ्यानं जर सांगितलं की तक्रारदारानं आवश्यक असलेली कागदपत्रं पुरवली नाहीत तर मोदी तक्रारदाराला विचारतात. समजा,

चूक अधिकाऱ्याची असेल तर मोदी तिथंच आदेश जारी करतात आणि समजा, तक्रारदारानं आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नसेल तर त्याला तसं सांगतात. पण मोदी निर्णय देतात हे नक्की. विशेष म्हणजे हिरोगिरी करत नाहीत. म्हणजे उगीचच अधिकाऱ्यांना झापत नाहीत किंवा तक्रारदार सरळ मोदींकडेच आला असेल तर त्याला अगोदर संबंधित पहिल्या अधिकाऱ्याकडे पाठवतात. तालुका स्वागतम्‌मध्ये, हे विशेष.

स्वागतम्‌मध्ये जाऊन आलेल्या एका पोलिस अधिकाऱ्यानं सांगितलेलं, अनुभव अधिक बोलका आहे. एकजण मोदी स्वागतम्‌मध्ये एका अनधिकृत बिल्डिंगची तक्रार घेऊन गेला. बिल्डिंग तर अनधिकृत आहेच, शिवाय सोसायटीतले लोक त्रास देतायत अशी तक्रार. मोदींनी संबंधित शहराच्या जिल्हाधिकारी आणि संबंधित पालिकेच्या अधिकाऱ्यांना विचारलं की तक्रारीत किती तथ्य आहे? अधिकाऱ्याला स्पष्ट उत्तर देता येईना. त्याची तारांबळ उडाली. मोदींनी एक साधा प्रश्न विचारला की बिल्डिंग अनधिकृत आहे की नाही?

अधिकाऱ्यानं अखेर सांगितलं, हो..अनाधिकृत आहे..

मग पाडली का गेली नाही? मोदींचा पुढचा प्रश्न.

कारण बिल्डिंगमध्ये सगळे दादा लोक राहतात. अधिकाऱ्याचं उत्तर.

मोदींनी फॅक्सवरून बिल्डिंगची सगळी कागदपत्रं लगेचच मागवून घेतली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ती तिथंच तपासली आणि बिल्डिंग अनधिकृत असल्याचं सांगितलं. मोदींनी आदेश दिला की ही बिल्डिंग उद्या संध्याकाळपर्यंत पडली पाहिजे, मग ती कुणाचीही असो आणि तसा रिपोर्ट सादर करा... मोदींचा झटपट निर्णय.

या स्वागतम्‌चा परिणाम असा आहे की कुठलाच अधिकारी एखाद्या व्यक्तीला भेटायचं टाळू शकत नाही. कारण भेट टाळली तर तो तक्रार मोदींकडे घेऊन जाईल अशी भीती. त्यातून अधिकाऱ्यांना तक्रारदारांची फक्त भेटच घ्यायचीय असं नाही तर तक्रारीचं निवारणंही करायचंय. म्हणजेच काहीही करून कामातून सुटका नाही. आपल्याकडे कधी हे होईल? आमदार, मंत्र्यांचा दरबार भरवला तर त्यात तेच गायब असतात आणि अधिकारीही तिकडे फिरकत नाहीत.

मोदींनी इतर राबवलेल्या काही कल्पनांनी तर अवाक् व्हायला होतं. गुजरातला वाचतं करायचंय तर काय करावं? मोदींनी सांगितलं 'वाँचे गुजरात'. म्हणजे राज्यातल्या सामान्य लोकांसह सगळे अधिकारी–मग तो कारकून असो की सुपर क्लास वन– सगळयांनी कुठल्याही वाचनालयात जाऊन तासभर वाचायचं. काहीही वाचा पण वाचा. त्याची सुरुवात खुद्द मोदींनी केली. मोदीच गेले म्हटल्यानंतर मंत्री गेले, अख्खं मंत्रिमंडळ गेलं म्हणजे अधिकारीही गेलेच, जावंच लागणार! तसा अधिकृत आदेश असतो. अन्यथा कारवाई. त्यामुळे दांडीला संधी कमी. वाचनाचा अहवाल अधिकाऱ्यांना सादर करावा लागतो. त्यावर चर्चा होते. आपल्याकडे जसं ज्ञानेश्वरीचं पारायण होतं तसं गुजरातमध्ये वाँचे गुजरातची पारायणं लागली. अख्खं गुजरात वाचत राहिलं. एका कल्पनेनं अख्खा गुजरात जोडला गेला. करिश्मा तयार होणार नाही तर काय?

पुढच्या दोन आयडिया ऐकल्यानंतर तर तुम्हीही मोदींना दाद द्याल. मोदींनी 'गुणोत्सव' नावाचा कार्यक्रम राबवला. म्हणजे राज्यातल्या सगळ्या अधिकाऱ्यांनी – मग तो क्लास वन असो की सुपर क्लास वन – प्रत्येक दिवशी पाच असं तीन दिवस पंधरा शाळांमध्ये जाऊन शिकवायचं. तीन दिवसांसाठी ही त्यांची अधिकृत ड्युटी. राज्याच्या मुख्य सचिवाचीही सुटका नाही. काय शिकवलं त्याचा अहवाल सादर करायचा. कुठल्या अधिकाऱ्यानं कुठल्या शाळेत शिकवायचं याची अधिकृत लिस्ट दिली जाते. कुणीही उठून कुठेही जायचं नाही आणि पाट्या टाकून यायचं नाही. गावात गेल्यानंतर अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांशी बोलायचं. समस्या जाणून घ्यायच्या. एखाद्या घरातले जर मुलीला शाळेत पाठवत नसतील तर त्यांच्याशी बोलायचं. पुस्तक, गणवेशाचा प्रश्न असेल तर तो तिथंच सोडवायचा. परिणाम असा की राज्याच्या मुख्य सचिवालाही शाळेची काय स्थिती आहे हे कळलं आणि लोकांनाही सरकार आपल्या शाळेत येतं याचं समाधान वाटतं. परिणामी, गुजरातमधल्या जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्या त्यात मतदानाची टक्केवारी होती ब्याण्णव टक्के. सत्ता अर्थातच भाजपाचीच म्हणजेच मोदींचीच.

लोक आणि प्रशासन यांच्यातलं अंतर मिटवायचं तर काय करावं? मोदींनी सांगितलं 'खेलोत्सव', म्हणजे अख्ख्या गुजरातनं खेळायचं. कल्पना चांगली आहे पण वाटते तितकी सोपी नाही. पैसा लागतो, व्यवस्था राबवावी लागते. पण ती हिट झाली. खेलोत्सवमध्ये अगोदर गावपातळीवर लोक, स्थानिक नेते, अधिकाऱ्यांनी खेळायचं. खेळ कुठलाही असो. खेळायचं. नंतर तालुक्यावर खेळायचं, त्यानंतर जिल्ह्यावर नंतर विभागावर आणि नंतर फायनल राज्यपातळीवर. इथंही सगळं अधिकृत. खेळासाठी मोदी सरकार पैसे उपलब्ध करतं. खेळणाऱ्या अधिकाऱ्यांच्या ड्युट्या तशा लावल्या जातात. गाव, तालुका, जिल्हा, विभाग सगळीकडे खेळ होतायत, म्हणजे आपोआपच मैदानं तयार झाली, असलेली सुधारली, नवीन खेळाडू मिळाले. अधिकाऱ्यांसोबत दोन हात करायची संधी लोकांना मिळाली. लोकांचा आणि अधिकाऱ्यांचा उत्साह ओसंडून वाहणारा. काही अधिकारी त्यांच्या टीमची चर्चा करतायत हे दृश्यच मला सुखावणारं होतं. मोदी द ग्रेट.

आणखी एक गोष्ट सांगण्याचा मोह आवरत नाही. आता ज्या ठिकाणी व्हायब्रंट गुजरात समिट होतंय तिथंच मोदींनी महात्मा मंदिर उभारलंय. मंदिर म्हणजे गांधीजींचं


मंदिर नाही तर त्यांच्या नावावर एक मोठी वास्तू उभी केली आहे, ज्यात समिट होत आहे. महात्मा मंदिराची उभारणीही भन्नाट झाली. मंदिराच्या पायाउभारणीचा दिवस ठरवला. त्या दिवशी प्रत्येक गावाच्या सरपंचाला गावची माती आणि पाणी घेऊन गांधीनगरला बोलावलं. खुद्द मोदींनी प्रत्येक सरपंचाकडून माती-पाणी स्वीकारलं आणि त्यातून पायाभरणी झाली. प्रत्येक जोडप्याला व्यवस्थित आणून योग्य सोय केली. बोलावलं आणि वाऱ्यावर सोडलं असं नाही. मोदींच्या एका कल्पनेनं दूर गावात असलेला गावकरी आणि समिटमध्ये बसून चर्चा करणारा उद्योगपती जोडला गेला. चर्चा करणारे कुठल्या तरी दुसऱ्या जगातले लोक आहेत ही भावना त्या गावकऱ्याच्या मनात येण्याऐवजी तो आपसूकच उद्योगपतींशी जोडला जातो. म्हणजे भारत आणि इंडिया मोदींनी एका कल्पनेनं जोडण्याचा प्रयत्न केलाय.

गुजरात आणि महाराष्ट्र ही जुळी भावंडं. दोन्ही सुवर्णमहोत्सव साजरा करतायत. मला महाराष्ट्रात एकदाही त्याचा फील आला नाही. गुजरातमध्ये त्याचा विसर पडत नाही. मी इथं एकही प्रश्न उपस्थित करणार नाही, कारण हे वाचल्यानंतर जे तुमच्या मनात येईल तेच माझ्या मनात आहे.

पुढची निवडणूक ज्यावेळेस येईल त्यावेळेस जर राहुल गांधींना मतदान करायचं की पंतप्रधानपदासाठी मोदींना, तर मी मोदींची निवड करण्याचं निश्चित केलंय. कारण दंगली कोण घडवत नाही? पण एखादा तरी सुपर क्लास वन अधिकारी मग तो आयएएस असो की आयपीएस मला माझ्या गावात येताना पाहायचंय, जे सध्या ते अशक्य वाटतं.

**माणिक मुंढे**
सिनियर प्रोड्युसर, स्टार माझा
स्टार न्यूज सेंटर,
ऑफ डॉ. इ मोझेस रोड,
महालक्ष्मी, मुंबई-११

## पुरस्कारप्राप्त पुस्तके





**उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स**
गोविंद काजरेकर

मूल्य ७५ रु.
सवलतीत ४५ रु.

गोविंद काजरेकर यांना 'उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स' या काव्यसंग्रहास महाराष्ट्राचा शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळाला आहे. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा विशाखा काव्य पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

---




**या शतकाचा सात-बाराच होईल कोरा...**
शंकरराव दिघे

मूल्य ८० रु.
सवलतीत ४० रु.

शंकरराव दिघे यांच्या 'शतकाचा सात-बाराच होईल कोरा' या काव्यसंग्रहास भि.ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.

---




**उदई**
प्रकाश चव्हाण

मूल्य १६० रु.
सवलतीत ८० रु.

प्रकाश चव्हाण यांच्या 'उदई' या आत्मकथनास विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

---


ग्रंथालीच्या विश्वस्त कवयित्री नीरजा यांना 'निरर्थकाचे पक्षी' या काव्यसंग्रहासाठी महाराष्ट्र शासनाचा २०१० सालचा कवी केशवसूत पुरस्कार प्राप्त झाला आहे.

# या शतकाचा सात-बाराच होईल कोरा

## एकनाथ पगार

'या शतकाचा सात-बाराच होईल कोरा...' शंकरराव दिघे यांचा कवितासंग्रह समकालीन जीवनावरची जळजळीत प्रतिक्रिया होऊन अवतरला आहे. 'सात-बारा होईल कोरा' हे भविष्य वर्तवताना हा भविष्याला जन्माला घालणारे भूत-वर्तमानही सुसह्य नसल्याने मूर्तिभंजन करू पाहणारे कविमन येथे दिसते. भूत-वर्तमानात सात-बाराच्या नोंदी बरबटलेल्या असून, कसणाऱ्या, कष्टकऱ्यांच्या जीवनमिळकतीवर भलतेच लोक हक्क सांगत स्वार्थ साधत असल्याचा या कविमनाचा इशारा आहे. परंपरा आणि परंपरासातत्य हे सर्व सामान्यांना, अभावग्रस्तांना नाडणारे घटक नाकारण्याची संघर्षप्रवृत्ती या दीर्घ कवितेत आहे.

सामान्य लोकांच्या ससेहोलपटीचे, शोषणाचे दाहक चित्र प्रकट करण्यासाठी लोककथा, पुराणकथा, प्रवचन,भारुड, गोष्ट असे परंपरागत रचनाबंध या संग्रहात स्वीकारलेले आहेत. 'लोक' या व्यापक समूहाच्या शोषणाच्या वाटचालीचा परामर्श घेण्यासाठी सूत्रधार निवेदन करतो, नाट्यनिर्माण करतो, गोष्ट सांगतो, संवाद म्हणतो, समजावतो, सामूहिक जाणिवांना हाका मारतो, जागे करतो, भडकावतो, उभे करतो, अहंकारांना धक्के देतो, आवाहन करतो, आव्हान देतो... मुख्य म्हणजे जनसामान्यांना संवादाच्या कक्षेत आणतो. या कवितेत वक्रोक्तीपूर्णता आणि वक्तृत्व यांची आवाजी सरमिसळ झाली या आहे. लोकसत्ताक व्यवस्थेत लोकसंबोधनाला महत्त्व असते, लोकमत सुमूर्त करणे, लोकमताला वळण देणे, लोक-अस्तित्व मान्य करणे यांनाही महत्त्व असते. म्हणून वंचित-उपेक्षित व नाडले गेलेले लोक उद्घोषणांनी, अभिभाषणांनी जागे करण्याची जबाबदारी या कवितेतील संबोधक-निवेदक यांनी स्वीकारलेली आहे. या जबाबदारीमुळे




ही कविता केवळ भाषण ठरत नाही. निवेदकाची खास जीवनदृष्टी, लोकसमूह-मानसातील उक्ती, लोकसांकेतिक प्रतिमाने, मिथके, भारुडकथनाची लयदारी भाषा यामुळे या काव्यकथनात काव्यात्मकता आली आहे. सामान्य विधानांमध्ये वक्रोक्तीमुळे आशय गडद करणारी प्रक्रिया घडताना दिसते. आशयाला उठावदारपणा आवाहक भाषावापरामुळे आल्याचेही दिसते. विधानातील प्रतिमानांना वर्तमान व गतकालीन संदर्भांचे अर्थ आहेत. प्रारंभीच्या आवाहनांचा संदर्भ महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' 'ब्राह्मणांचे कसब' व 'गुलामगिरी' या वैचारिक संहितांशी आहे. पुरोगामी विचारांच्या संहितांशी या कवितेचे सहसंवादी नाते असावे, त्यामुळे पूर्वसंहिता-संवाद साधला गेला आहे.

अव्यवस्था, शोषण, भ्रष्टाचार, राजकीय कपटकारस्थाने, स्वार्थी कृती, दांभिकता वगैरे समकालीन जीवनदोषांविरुद्ध येथील निवेदक संतप्त होतो, उपरोधाने अव्यवस्थेवर आघात करतो, एक प्रकारे वक्रोक्तीतून अव्यवस्थेवर प्रतिक्रिया नोंदवतो. सत्ताधारी, लबाड, शोषक वगैरे जे कोणी धनदांडगे, ज्ञानदांडगे भांडवलदार आहेत त्यांच्या सत्तेच्या विरुद्ध थेट लढाई वक्रोक्तीतून साधण्याचा प्रयत्न करतो. उदाहरणार्थ-

*पुत्रांसाठी तुम्हा अमेरिका*
*त्यांच्यासाठीच सॅनहोजे*
*मुलींसाठी छोटा पडदा*
*कमवून घ्या न् धूम ठोका...!*

*ज्यांना मरायचे इथेच*
*त्या खळगुट्यांच्या*
*कपाळावर भगवे पट्टे बांधा...*
*अन् वंदे मातरमचा धोशा लावत*
*आईच्याच पदराला*
*आरडीएक्सचे पलिते बांधा.*

धर्माच्या नावाने केले जाणारे राजकारण, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून आलेली नफेखोर स्पर्धा, मूल्यऱ्हास, परंपरागत ज्ञानाचे सत्ताधारी, त्यांच्या कृतींतले बदल, विविध बाबा-बुवांचा उदय व लोकप्रियता, धर्मातून निर्माण झालेला दहशतवाद... अशा आशयसूत्रांचा प्रत्यय येथे आहे. धर्माचे राजकरण, धर्माचे अर्थकारण, धर्माचे कर्मकांडी-चमत्कारी रूप यांना निवेदक आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतो.
धर्माचा जेव्हा होतो बुद्धी का बाल
धर्मातही घुसते जेव्हा कट प्रॅक्टिसची चाल
भौतिक प्रश्नांना अलौकिक उत्तरे

*देऊ लागतात मृतात्मे*
*अन् नक्षत्र, ग्रहांचे इंद्रजाल*
*विठूही भोगतो सजा शुद्धिकरणाची*
*जेव्हा अंगावर पडते शेपूट तुटकी पाल*

अशा तऱ्हेने धर्मऱ्हासाचा, महाराष्ट्र-संस्कृतीत बेदखल करण्याचा कर्मकांडात्मक नफेखोर खेळ हा निवेदक उघडा पाडतो. वैद्यक व्यवसायाचे सध्याचे अस्तित्व 'कट-प्रॅक्टिस'वर अवलंबून असल्याचे लोकप्रिय मत येथे धर्मकारणाशी संबद्ध केले आहे. वैद्यक व्यवसायातील पातिव्रत्य आणि धर्मकारणातील पावित्र्य धोक्यात आल्याचे पूरक संदर्भ येथे आहेत. मराठी संस्कृती व संस्काराचे वहन करणारा वारकरी संप्रदाय विठ्ठलभक्तीची परंपरा चालवत आला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये नवे बाबा, नवे धर्मप्रचारक पंचतारांकित, दूरदर्शनी पंडित उदयाला आल्याने खरा धर्मसंस्कार आणि आचार काहीसा क्षीण झाल्याचे सभोवतालचे चित्र आहे. विविध संपर्कमाध्यमे व मठ प्रमुख धर्मसंस्थेला बाजारू-चमत्कारी व कर्मकांडी रूप देत असल्याचा राग निवेदक प्रकट करतो. धर्म, राजकारण, ज्ञान, अर्थ या सत्ता सामान्यांच्या, शेतकऱ्यांच्या शोषणाचे कार्य चालवत आहेत, अशी प्रचिती निवेदक देऊ इच्छितो.

*बांधावरचा कुणबी- देवळातला उंदीरमामा*
*यांच्या कुपोषणाची नोंद नसते कधी दप्तरात*
*मंदिरातल्या तिजोऱ्या भरून वाहतात*
*हाताने शक्य नाही म्हणून*
*चाळणी लावून मोजतात*
*तृप्त गाभाऱ्यांनाच कसे लागतात*
*देणग्यांचे डोहाळे...?*

ही विषम स्थिती निर्माण होण्याची कारणपरंपरा सांगितली जाते, पण विषम स्थितीचे विश्लेषण येथे नाही, कवी त्याला सभोवतालाबद्दल जे दिसते- अनुभवले आहे त्याबद्दलची भावप्रतिक्रिया फक्त नोंदवतो.

स्वातंत्र्योत्तर काळात वैचारिक बांधिलकीचा झालेला ऱ्हास आणि सामाजिक घसरण होत गेल्याचा सल प्रकट करताना निवेदक म्हणतो -

गांधीनं दिलं तेल... ज्यांच्या नावांच्या
वाती लावून घेतलं घर उजळवून
तो नावापुरता ज्ञानेश्वर
कामापुरते पसायदान
तुका गेला तेल लावत...
शाहू घडवला शाडूला
क्रांतिबाला वर्ग केलं ओ.बी.सी.त...
अन् घटनाकार तर आमच्या जातीचा
शिवाजीला अजून कळंना तो कुणाचा
त्याच्या पुतळ्यावर काही फेकून
धरता येतं सगळ्यांनाच वेठीला

महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, ज्ञानोबा-तुकोबा, शाहू महाराज किंवा अगदी छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार-कार्य शबलीत करणारी अव्यवस्था या निमित्ताने समोर येते. पुरोगामी विचारांची पीछेहाट निवेदकाला तापदायक वाटते. जात्यंताचा लढा पुन्हा उभा राहावा अशी परिस्थिती असल्याचे अनुमान ही कविता देते.

सामान्यत: खेडेगाव, कृषीसंस्कृती आणि तेथील मूल्यऱ्हासाचे आशयसूत्र या दीर्घ कवितेत अधिक ठळक होते. समकालीन विविध संदर्भाचे भान यातून जागे होते. बहुदिशीय विचारप्रतिक्रिया त्यातूनच अवतरल्या आहेत, एकच एका आशयसूत्राचे भाववणे त्यामुळे घडत नाही. विविध संदर्भांचे सरमिसळलेपण गुंतागुंतीची परिस्थिती दर्शवते. वर्तमानपत्रीय वास्तवाच्या पलीकडे झेप घेण्याची शक्यता आणि क्षमताही या दीर्घ कवितेत जाणवते. उदाहरणार्थ -

*तर असा झाला विचारांचा पराभव*
*जे झिरपलं असं वाटलं...*
*तेच रोखून धरलं खुबीनं*
*मजकूर गेला समासाबाहेर अन्*
*समासच 'मॅटर' बनला*
*ज्याचं पाहू नाही तोंड, त्याची*
*गांड धुण्याला पुण्यकर्माचा दर्जा मिळाला!*

परिवर्तनवादी विचारांची पीछेहाट तर सारखी सुरूच आहे. चुकीचे किंवा भंपक नमुनादर्श साहित्य- संस्कृती- तत्त्वज्ञान-कला यांच्या क्षेत्रात उभे केले जातात. संतमहात्मांच्या विचारांचे अपवाचन मांडले जाते, वैचारिक भोंदूगिरीला महत्त्व दिले जाते. 'पत-प्रतिष्ठा-प्रसिद्धी' यांचा शिरकाव विचारपरिवर्तनाच्या चळवळींमध्ये झाल्याने 'निके सत्त्व' फोलपट म्हणून बाजूला सारले जाते आहे. दाखवेगिरी प्रबळ ठरते आणि 'मूळ' हरपून जाते, असा कयास ही कविता देते. सत्त्वहरण ही समकालीन आणि तात्पुरती प्रक्रिया असल्याने मूळ सृजनाचा झरा शाबूत आहे, अशी आशावादी जाणीवही निवेदक प्रकट करतो-

*हस्तमैथुनाने कुणाला गर्भ राहत नाही*
*यांना ब्रह्मपुत्र म्हटल्याने*
*इतिहास बदलत नाही*
*इतिहासावरील बलात्काराने*
*'राज्ये' मिळत नाहीत*

कृतींना विकृतींचे रूप आले की मग पडझड सुरू होते, स्वातंत्र्यमूल्य धोक्यात येते, असा विचारही येथे आहे.

वर्तमानावर भाष्य करण्यासाठी, वर्तमानावर ओरखडे ओढण्यासाठी पुराणकथनाचा पवित्रा मध्येमध्ये घेतला आहे. देव, इंद्र, विष्णू, नारद वगैरेंचे समकालीन अवतरण अगदीच विशोभनीय झाल्याचे कवी दाखवतो. पुराणकथनाला हास्यास्पदताही येते. उदाहरणार्थ, विष्णूचे पिटिशन इंद्राच्या कोर्टात, इंद्राने विष्णूला अवतार घेण्याचा आदेश काढला, सोशल इंजिनीयरिंगचा संदेश घेऊन विष्णू निघाले मानवाला भेटायला इ. पुराणकथन हास्पास्पद बनते कारण ज्या समकालीनतेवर कवीला आघात करायला आहे, ती समकालीनता हास्यास्पदच आहे. उदाहरणार्थ,

*झेंडे वेगळे असले तरी*
*दांडे सारखेच आहेत*
*नवा भिडू पुढे येईल अशी*
*ठेवलीच नाही फट...*
*किंवा*
*पशुखाद्यात ग्रामपंचायत*
*प्लास्टिक पिशव्यांत मार्केट कमिटी*
*सिमेन्टमध्ये पंचायत समिती*
*नासक्या दुधामध्ये जिल्हा परिषद अन्*

बारदान, सुतळीत जिल्हा बँक
अल्कोहोल, मळीत विधानसभा काढतो
लोकसभेला मदत करतो.
राजकीय परिस्थितीचे हे समकालीन विचित्र हास्यास्पद आहे.


स्थानिक वा केंद्रीय प्रशासन यंत्रणाही भ्रष्ट आहे, आपल्या नियोजित कार्यात, कर्तव्यात ती दुबळी आहे. नोकरशाही आणि लोकशाहीचे नियंते कर्तव्यकर्मापासून दूर गेलेले आहेत, त्यामुळे एकूणच जीवनात विसंगतींचे तांडव सुरू असते. उदाहरणार्थ,

इथं गुन्ह्याचा तपास होताना
गुन्हेगार हिरो बनतो,
आमचा देशच असा
सगळे डिटेल्स सांगितले तरच
बलात्कार सिद्ध होतो
सनंग सटकते दुबईला अन्
बुचका लागतो सी.बी.आय.च्या हाताला...


न्यायमंडळ, कार्यकारीमंडळ, विधानमंडळ वगैरे सारे हतबल आहेत, अशी परिस्थिती सत्ताधाऱ्यांनी निर्माण केल्याचा दोषारोप येथे आहे. जाती, धर्म, सत्ता, पैसा, ज्ञान यांच्या बळावरच शोषणाची दीर्घ परंपरा सत्ताधाऱ्यांनी निर्माण केली आहे.

सामान्यत: राजकारणाला प्रश्नांकित करण्याची भूमिका निवेदकाने घेतली आहे. आहे त्या कोणत्याही परिस्थितीला राजकीय सत्ताधारी जबाबदार असल्याचे येथे दाखवले गेले आहे. गोरगरीब सामान्य शेतकरी, शेतमजूर, कामगार, बेरोजगार हेही हतबलच आहेत, वस्तुत: या साऱ्यांनीच आहे त्या परिस्थितीला परिवर्तित करणे आवश्यक आहे. मूल्यविहिनांना या मूल्यांच्या कक्षेत आणण्याची जबाबदारी जनसामान्यांची आहे. मूल्यऱ्हास, विसंगती, भ्रष्टाचार, राजकीय दुरवस्था, जातीयवाद वगैरेचे दर्शन घडते, हे दर्शन घडवणारे माहीतही आहेत म्हणूनच सर्वसामान्यांनी नुसते दर्शनच करावे असे नाही, हा निष्कर्षात्मक संदेश शंकरराव दिघेंनी या कवितेतून दिला आहे.

सर्वसामान्य लोक-गण यांनी जागरूक होण्याची आवश्यकता दिघेंना कळली आहे.

**११ डिसेंबर २०१० रोजी प्रसिद्ध झालेल्या 'संत तुकोबांची रोजनिशी' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी प्रदीप गुजर, यशवंत देव, अनंत देशमुख आणि लेखक रवींद्र पाटील**



संत तुकोबांची रोजनिशी

**रवींद्र पाटील**

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २०० रु.**


लोकशाहीवरील त्यांची श्रद्धा प्रगाढ आहे-
गणांनी या गणतंत्रात आता
स्वर्गाचे मार्गदर्शन मागू नये.
आपल्या कृतीच्या समर्थनार्थ
ग्रंथामध्ये आधार शोधू नये.
स्वप्रज्ञेनेच त्यांनी करावी
नव्या जनतंत्राकडे वाटचाल...
...नव्या व्यवस्थेत मात्र माणसामाणसात
उभ्या राहू नयेत कुठल्या भिंती
पाखरांना जसे सर्व आकाश
तशी सर्व माणसांसाठी असावी पृथ्वी...

नारायणाच्या तोंडी असा मानवतावादी संदेश अखेरीस आला आहे. मानवता, ममता, स्वातंत्र्य, बंधुता अशा मानवी मूल्यांचा जागर अखेरीस आहे.

आहे ते काही ठीक नाही, मूल्यवान नाही म्हणून या नकारात्मक व्यवस्थेसाठी होकारात्मक संदेश नारायणाच्या तोंडी आला आहे.

चमकदार भाष्ये, कोटीप्रक्रिया, अगदी ताजे जीवनसंदर्भ, बोलीरूपता, संदेशनाची हौस, संवादप्रभुत्व, शब्दांचे नेमके उपयोजन, भरभरून बोलत राहणे आणि व्यंगदिग्दर्शन अशा काही वैशिष्ट्यांमुळे ही कविता जन-आवाहक बनली आहे.

**- डॉ. एकनाथ पगार**
विठेवाडी रस्ता,
देवला, जिल्हा- नाशिक

# 'युनिक फीचर्स'चे संवादी संमेलन

रमेश दिघे

पुण्या-मुंबईच्या वर्तमानपत्रांप्रमाणे उच्च दर्जाच्या पत्रकार, विचारवंत, लेखक, सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून लेखन, मजकूर-मुलाखत मिळवणे ही ज्या काळात जिल्हा वर्तमानपत्रांसाठी कठीण बाब होती त्या काळात पुण्यात युनिक फीचर्सची सुरुवात झाली. चांगला सकस, योग्य प्रकारे संपादन केलेला मजकूर फोटोंसह मिळू लागल्याने सुहास कुलकर्णी, आनंद अवधानी व संतोष कोल्हे यांची फीचर एजन्सीची कल्पना त्या काळात खरोखरच 'युनिक' ठरली. इतकी की पुण्या-मुंबईच्या वर्तमानपत्रांचे, साप्ताहिक-मासिकांचे पान युनिकशिवाय हलत नव्हते! नवे विषय, नवे लेखक यांचा सतत शोध घेत युनिक फीचर एजन्सीच्या व्यवसायात सतत अग्रगण्य राहिली. त्यानंतर, युनिक सुरू झाल्यावर प्रतिवर्षी फीचर एजन्सींची संख्या वाढत राहिली. पण गुणवत्तेच्या बाबतीत या एजन्सी युनिकच्या जवळपासही पोचू शकल्या नाहीत. दरम्यान, इलेक्ट्रॉनिक माध्यमाची गरज ओळखून त्यातही युनिक वावरले. मासिके बंद होत असतानाच्या काळात 'अनुभव'सारखे गंभीर चर्चा घडवून आणणारे मासिक युनिकने यशस्वीपणाने चालवून दाखवले.

याच अनुभवाच्या जोरावर इतर आणखी काही मासिके युनिकने संपादित केली. पुणे शहरातील महापालिकेचा प्रत्येक वॉर्ड पिंजून काढून जनतेचे प्रश्न सडेतोड मांडणारे लोकजागरसारखे सदर चालवले. केवळ निवडणूक वार्तापत्रे न देता निवडणूक निकालांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण युनिकने केले. प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र अभ्यास करण्याचा महाप्रकल्प राबवण्यात पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाला युनिकची मोलाची साथ मिळाली. या प्रकारे सतत जागरूक राहून युनिकने नवनवे उपक्रम-प्रयोग यशस्वी केले. त्यांच्या पुस्तक प्रकाशनाच्या कार्याला वाचकांनी असाच भरघोस प्रतिसाद दिला.

इंटरनेटच्या माध्यमातून युनिकने आयोजित केलेले साहित्य संमेलन हा असाच काळाच्या बरोबर राहण्याचा प्रयत्न म्हणायला हवा. पारंपरिक साहित्य संमेलनातील वाद-गोंधळ, संमेलनाच्या निमित्ताने साहित्यापेक्षा इतर विषयांची चर्चा होणे. त्याबद्दलचाच मजकूर अधिक प्रसिद्ध करण्यात वर्तमानपत्रांमध्ये निर्माण झालेली स्पर्धा आणि त्याला वृत्तवाहिन्यांची मिळालेली जोड या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त वाचकांना सहभागी करून घेण्यासाठी युनिकने हा नेटवरील संमेलनाचा घाट घातला. त्याचे वृत्तपत्र-वृत्तवाहिन्यांनी जोरदार स्वागत केले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाला मोठी प्रसिद्धी मिळाली. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरातील जवळपास सव्वीस देशांमधून युनिक संमेलन साईटला प्रतिसाद मिळाला. यानिमित्त, मराठी माणसाला नोकरी-व्यवसायासाठी आपल्या गावाच्या बाहेर जायला आवडत नाही हा दोषारोप तथ्यहीन असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. आज जवळपास अडीच कोटी मराठी माणसे नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने महाराष्ट्राबाहेर आहेत. 'साईटला प्रतिसाद देणाऱ्या मराठी माणसांच्या देशांची नावे जरी वाचली तरी मराठी साहित्य संस्कृतीचे चिंतन करणारा, त्याबद्दल आस्था बाळगणारा मराठी माणूस हा जगातील किती लहान-लहान देशांमध्ये विखुरलेला आहे याचा अनुभव आम्हाला या निमित्ताने आला. तो खरोखरच उत्साह वाढवणारा आहे' असे सांगून युनिकच्या गौरी कानिटकर म्हणतात, हा उपक्रम आगामी काळात आणखी प्रगत, प्रगल्भ करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

मैदानी संमेलनं आणि नेट माध्यमावरचे हे संवादी संमेलन यांत हाच फरक आहे. केवळ उत्सवी स्वरूपात सादर होणाऱ्या पारंपरिक साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषणातून नवे विचार फार कमी वेळा ऐकायला मिळतात. त्यातील परिसंवादांतील चर्चेला सखोलतेचा अभाव असतो आणि कवी संमेलनातून, चोवीस तासांच्या कवीकट्ट्यातून पुढे येणाऱ्या कवींची संख्याही मर्यादित असते. संमेलन होणार म्हणून एक पुरवणी काढायची, अध्यक्षीय भाषणावर अग्रलेख खरडायचा आणि संमेलन संपल्यावर एक आढावा घेणारा लेख प्रसिद्ध करायचा. बाकी संमेलनाला जोडून असलेल्या पुस्तक प्रदर्शनात आवर्जून खरेदी करावी अशी पुस्तके कोणती आहेत, कोणाच्या स्टॉलला भेट द्यावी किंवा चर्चेतील नवे मुद्दे कोणते होते, चर्चेत सहभागी नसलेल्या नामवंतांची काही वेगळी मते आहेत का? याचा वेध वर्तमानपत्रवाले घेत नाहीत. किंबहुना जवळपास एक कोटी रुपये खर्च करणारे आयोजक त्याच्या कायमस्वरूपी दस्तावेजीकरणाला (डॉक्युमेंटेशन) महत्त्व देत नाहीत. अलिकडे संमेलनाचे अध्यक्ष छापील व ऐनवेळेचे उत्स्फूर्त असे मिश्रभाषण करतात. त्यांचे व तोलामोलाचे उद्घाटक असतील तर त्यांचे अशी निदान दोन भाषणे प्रतिनिधी शुल्क भरणाऱ्यांना द्यावीत असे आयोजकांना वाटत नाही. खरे तर आयोजक तीन दिवस

स्वतंत्र बुलेटिन वार्तापत्र प्रसिद्ध करू शकतील इतके बरेच काही संमेलनात घडत असते.

या तुलनेत इंटरनेटवरील संवादी संमेलनाचा फायदा असा की अध्यक्षीय भाषणापासून या संमेलनात झालेल्या चर्चा-परिसंवाद युनिकच्या वेबसाइटवर उपलब्ध असणार आहे (www.uniquefeatures.in). या इ-संमेलनाच्या निमित्ताने वर्तमानपत्रां-मधून जे चर्चात्मक लेख प्रसिद्ध झाले त्यांची दखल घेऊन युनिकने त्यांची साईट अपडेट करावी. जोपर्यंत युनिक या संवादी-संमेलनाच्या फंदात पडले नव्हते तोपर्यंत त्यांनी या क्षेत्रात पुढे काय करावे याची अपेक्षा जाहीर व्यक्त होत नव्हती. पण हा पहिलाच उपक्रम यशस्वी झाल्याने आता युनिक पुढे काय करणार याची उत्सुकता आहे. युनिकलाही त्याची जाणीव आहे. त्यासंबंधात गौरी म्हणतात, 'संवादी संमेलनाला अजूनही बराच प्रतिसाद येतोय. मैदानी संमेलनातील भाषणे-चर्चा-वृत्तपत्रे-वाहिन्यांच्या गाळणीतून वाचकांपर्यंत पोचत असते. बाहेरगावचा, बाहेरच्या देशातील वाचक हा विस्तृत वार्तांकनापासून वंचित राहतो. आम्ही आमच्या सर्व चर्चा साईटवर ठेवल्यात. नामदेव ढसाळ, वसंत आबाजी डहाके यांचे विचार लेख स्वरूपात वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध झालेत. वृत्तवाहिन्यांनीसुद्धा इ-संमेलनाध्यक्ष रत्नाकर मतकरींसह अन्य काही जणांच्या मुलाखती प्रक्षेपित केल्यात.' युनिकने संवादी संमेलनासाठी साहित्यिक, पत्रकार, विचारवंत यांच्याशी संपर्क साधला त्यावेळी प्रत्येकाने उत्साहाने त्याला प्रतिसाद दिला.

इथपर्यंत हे सगळे छान, कौतुकास्पद असले तरी यासंबंधात काही आक्षेप, मतभेदही नोंदवायला हवेत. मुख्य म्हणजे साहित्य संमेलनातील उणिवांना संवादी संमेलन पर्याय ठरू शकत नाही याच्याशी युनिक-संयोजकही सहमत होतील. किंबहुना त्यांनी या संमेलनाच्या निमित्ताने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात तसा दावाही केलेला नाही. परंतु मुद्दे उपस्थित झालेत ते या संमेलनाचे अध्यक्ष रत्नाकर मतकरी यांनी मैदानी संमेलनाप्रमाणे त्यांच्या भाषणाचा रोख ठेवल्यामुळे. त्यांच्या संपूर्ण भाषणात नेट या माध्यमाचे सामर्थ्य, त्याची विचारांची देवाणघेवाण करण्यात होणारी मदत अशा नव्या मुद्यांचे विश्लेषण नाही. वाचनसंस्कृती वाढवणे हा दोन्ही संमेलनांच्या इतर उद्दिष्टांपैकी एक आहे. मुख्य भाग हा विचारांच्या आदानप्रदानाचा आहे. अर्थात पहिल्या संवादी संमेलनाचे आयोजन हे अगदी ऐनवेळी ठरल्याने या वर्षी त्यात काही त्रुटी राहून जाणे अपेक्षित आहे. तरीसुद्धा मैदानी संमेलनापेक्षा या संमेलनातील परिसंवादाचे विषय आणि वक्त्यांची निवड अत्यंत अचूक अशी होती. 'इंटरनेटमुळे साहित्याचा पैसा वाढतो आहे', 'साहित्येतर दबावापुढे लेखकांनी शरणागती पत्करली आहे', 'वर्तमानपत्रांनी साहित्याला बेदखल केले आहे', 'संमेलनाला मिळणारा एक गठ्ठा पैसा ही चिंतेची बाब आहे का? हे विषय वाचकाला थेट भिडणारे होते. या परिसंवादांसाठी दीनानाथ मनोहर, सदा डुंबरे, निळू दामले, अच्युत गोडबोले, जयदेव डोळे, अरुण खोरे, रंगनाथ पठारे, वसंत आबाजी डहाके, अवधूत परळकर, कविता महाजन, प्रसाद शिरगावकर, संजय जोशी अशी माध्यमांमधील जाणकारांची भक्कम टीम होती. साहित्यव्यवहार, आजच्या साहित्यातील नवे प्रवाह आणि नेटचे माध्यम अशी जाणीव असल्याने परिसंवादातील चर्चा नेमक्या झाल्या. चर्चा-मुलाखतींपैकी अरुण साधू यांची मुलाखत ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात लाइव्ह होती. बाकीच्यांना ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून बघता आले नाही.

सत्तरच्या दशकातील दलित साहित्याने मराठी साहित्यात काय बदल घडवले याबद्दलची परखड मते नामदेव ढसाळ यांच्या मुलाखतीत व्यक्त झाली आहेत. ग्रंथालीने दलित आत्मकथने प्रसिद्ध करून केवळ दलित साहित्याचा प्रवाह वाहता केला असे नाही तर दलित लेखकांची पुस्तके किती वेगाने खपू शकतात याचे प्रात्यक्षिकही घडवले. ग्रंथालीत असताना मी याचा अनुभव घेतलाय ते नमूद करण्यासारखा आहे. नांदेडला बाबुराव बागूल यांच्या अध्यक्षतेखाली दलित साहित्य संमेलन आवारात बलुतं, उपरा ही व इतर पुस्तके मांडली. 'साखर आली' अशी हळी गावात दिल्यावर तिथल्या रेशन दुकानासमोर जशी झुंबड उडते त्याप्रमाणे संमेलन परिसरात एकाने आरोळी दिली, 'अरे, उपरा आला' आणि म्हणता म्हणता फाटक्या कपड्यातील माणसांची गर्दी माझ्याभोवती झाली. एक-एक चुरगळलेला रुपाया बाहेर काढत त्यांनी उपरा, बलुतं, सिंहासनाच्या प्रती घेतल्या. त्यानंतर आता देशीदारूच्या दुकानाबाहेर अशी फाटक्या कपड्यातील लोकांची गर्दी दिसते. १९९०नंतरच्या जागतिकीकरणाने जोपासलेल्या चंगळवादाने चळवळींची नशा पार उतरवून टाकली आहे. हे कसे घडले हे ढसाळांच्या मुलाखतीने स्पष्ट झाले नाही.

नेटवरील संमेलन युनिकने हौस म्हणून केलेले नाही. त्यांना चर्चा, सखोल चर्चा, मतांची देवाणघेवाण हेच अपेक्षित आहे. औरंगाबादला ग्रंथालीचे पुस्तक विक्री केंद्र सुरू करण्यात पुढाकार असलेल्यांपैकी निशिकांत भालेराव हे संवादी संमेलनाच्या प्रमुख चार आयोजकांपैकी एक. ते म्हणतात, 'हा उपक्रम कायमस्वरूपात चालू ठेवण्यासाठी आम्ही बऱ्याच गोष्टी करणार आहोत. या वर्षभरात आणखी साहित्यिकांशी संपर्क साधून त्यांचा सहभाग घेण्यासाठी प्रयत्न केला जाईल. आम्ही नेटसंस्थांसाठी नवीन आहोत तसेच हा प्रकार आमच्यासाठी नवीन आहे.' साहित्यिकांना सहभागी करून घेण्याची कल्पना चांगली असली तरी या साहित्यिकांना आधी संगणक साक्षर करणे महत्त्वाचे आहे. अजून कित्येक साहित्यिकांना साधा मोबाईल वापरता येत नाही. फक्त कॉल कसा घ्यायचा आणि करायचा एवढेच माहीत, बाकी एसएमएस पाठवता येत नाही. संगणकापर डीटीपी करता येणे, इ-मेल

पाठवणे, नेटवर एखादी गोष्ट शोधणे या सगळ्या गोष्टींपासून पुण्या-मुंबईचे अनेक नामवंत साहित्यिक दूर-दूर आहेत.

आपण नेट माध्यमातील संमेलनाच्या गप्पा मारतो पण प्रत्यक्षात लेखकाला आपल्या पुस्तकाची साधी प्रेसकॉपी तयार करता येत नाही. लेखकाने त्याचे लेखन उत्तम डीटीपी केले तरी बरीच प्रगती केली असे म्हणता येईल. ह.मो. मराठे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक त्यांच्या सदराचा एक लेख फॅक्सने मुंबईच्या एका नामांकित वृत्तपत्राच्या पुणे कार्यालयाकडे पाठवतात. दुसऱ्या दिवशी त्यांना फोन येतो, की तुमचा लेख गहाळ झालाय पुन्हा पाठवा. असे तीन वेळा होते. वर्तमानपत्रांच्या गचाळ कारभारातून मराठी लेखकांची सुटका झालेली नाही. हे उदाहरण एवढ्यासाठीच दिले की ह.मो. हे एक ज्येष्ठ लेखक. वयाची सत्तरी पार केल्यानंतरही ते रोज एक सदरासाठीचा लेख पाठवतात, जे वर्तमानपत्र साहित्य-संस्कृतीविषयक बातम्या ठळकपणाने प्रसिद्ध करते. एक जबाबदार वर्तमानपत्र असा ज्या पत्राचा दबदबा आहे त्या वर्तमानपत्रात एका लेखकाचा, तो सुद्धा नेहमीच्या सदराचा लेख दोन वेळा गहाळ होतो. वर्तमानपत्र साहित्यालाच नव्हे तर साहित्यिकांनाही बेदखल करू लागलीत. अपुरे मानधन, तेही विलंबाने दिले जाते. युनिकला जर 'समकालीन' लेखकांना घेऊन 'नेट' संमेलन घ्यायचे असेल तर अशा अनेक बारीकसारीक गोष्टींची नोंद घ्यावी लागेल.


इ साहित्य संमेलनाची भूमिका विशद करताना जे निवेदन युनिकने प्रसिद्ध केले आहे त्यात तरुणाईबद्दलची विधाने चुकीच्या पद्धतीने आलेली आहेत. त्याचप्रमाणे इतरही काही मुद्दे चुकीचे वाटतात. जसे वाचनसंस्कृती. ही संस्कृती ही संपूर्ण समाजाची म्हणून असते. मुळात १५ ते ३५ हे तरुणाईचे वय स्थित्यंतराचे असते. तारुण्यातील मौजमजा ते करिअरचा गांभीर्याने विचार असे हे स्थित्यंतर असते. पस्तिशीनंतर व्यक्तीमध्ये विचार-वागणे-कृतीबद्दलची परिपक्वता येऊ लागते. सत्तरच्या दशकात व्यक्त होण्याचे 'पुस्तक' हे एकमेव माध्यम होते. आता त्याला अनेक पर्याय उपलब्ध झालेत. शेवटी 'फॉर्म' कोणता हे महत्त्वाचे नसून व्यक्त होणे व ते व्यक्त झालेले जास्तीत जास्त व्यक्तीपर्यंत पोचणे हे जास्त महत्त्वाचे वाटते. त्यामुळे युनिकने वाचनसंस्कृती चर्चेच्या घोळात जास्त अडकून न राहता व्यक्त होण्याला वाट मोकळी करून द्यावी. नेटचे माध्यम त्यासाठी जास्तीत जास्त 'लाइव्ह' स्वरूपात कसे वापरता येईल याचा विचार करावा. उपक्रमांमधील तरुणाईच्या सहभागाबद्दल असेच म्हणता येते. दोन वर्षांपूर्वी पुण्यातील एफ.टी.आय. संबंधित एका तरुणांच्या गटाने तरुणांनी तयार केलेल्या ॲनिमेशनपटांचा आंतरराष्ट्रीय महोत्सवाची घोषणा केली. याबद्दलची ऑनलाईन नोंदणी सुरू होताच एका दिवसात जगभरातून एक हजार 'एन्ट्री' आल्या. हा प्रतिसाद आयोजकांना चकित करणारा होता. वेगवेगळ्या चाळण्या लावून अमिनेशनपटांची अंतिम यादी तयार झाली. एक दिवसाचा महोत्सव पाहण्यासाठी तरुण प्रेक्षकांनी तुडुंब गर्दी केली. अनिमेशनचे विविध प्रकार तेथे अनुभवायला मिळाले. ही सगळी नेट माध्यमाची किमया आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवल्या जाणाऱ्या साडेतीनशे चित्रपटांपैकी निवडक, आशयघन चित्रपटांना तरुणांचा भरघोस प्रतिसाद मिळत असतो. नेटवर अनेक साइट पाहून तरुण जगभरातील चांगल्या चित्रपटांची निवड करतात. हे माध्यम त्यांना जास्त संवादी वाटते. याची दखल संवादी संमेलनाच्या आयोजकांनी आधीच घेतली असेल.

**रमेश दिघे**
द्वार, बी.आर. भोंग
१४९६, शुक्रवार पेठ, नेहरू चौक,
प्रकाश मसालेशेजारी,
पुणे-४११००२२
भ्रमणध्वनी - ९४२३०४७४४०

## 'ग्रंथाली'ची पुनर्मुद्रित प्रकाशने



**आभरान**
**पार्थ पोळके**
**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



**असुरेंद्र**
**ना. बा. रणसिंग**

रामाहून श्रेष्ठ ठरावा असा गुणसंपन्न वीर, असुरांना प्रिय असलेला महाबली रावण याचा आणि असुर जमातींचा नाश का झाला? याला रावण कुठवर जबाबदार होता? त्याच्या ऱ्हासाला कोण कारणीभूत होते? हे शोधण्याचा हा प्रयत्न...

**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**

# बाईच्या कविता...

**संदेश ढगे**

'बाई किंवा कविता पूर्ण कळलीय, असं म्हणणारी माणसं मला एक तर फार भाबडी वाटतात किंवा खोटारडी.' – असे कवी किरण येले यांनी परिशिष्ट निवेदनात मांडल्यावर, संग्रहातल्या कवितांबाबत उत्सुकता वाढत जाते. 'बाईच्या कविता' हा संग्रह वाचताना या कवितेच्या निर्मात्याने लावलेल्या सापळ्यात वाचक अल्लद अडकून पडतो आणि मग सुटकेसाठी जेवढा धडपडू लागतो तेवढा तो अधिकच अडकत जातो. याचे कारण कवीची अवस्थताही हे सारे लिहिताना अशीच झालेली असते, हे आपल्याला या सगळ्या कवितांतून आणि पुस्तकाच्या शेवटी लिहिलेल्या परिशिष्टातून कळते आणि म्हणूनच मग कवीने भोगलेल्या सगळ्यांच्या भोगवट्याला स्तिमित झालेला वाचक खुल्या दिलाने सलाम करतो.

एकूण सत्तेचाळीस कवितांतून बाईपणाच्या बऱ्यावाईट, विविधांगांचा, तिच्या आतल्या पडझडींचा, मन:पटलाचा आलेख मांडताना कवी मुक्तछंदाचा आधार घेतो आणि मुक्तछंदातल्या लयीत तो बाईपणाचा साक्षात्कार घडवण्याचा प्रयत्न करत राहतो. या साक्षात्कारांनी वाचक अचंबित होत राहतो हे या संग्रहाचे वैशिष्ट्य. काही विचित्र रिवाजांमुळे अज्ञानी, कुचकामी पुरुष, त्यांची लायकी नसतानासुद्धा स्त्रियांवर आपली सत्ता गाजवतात. स्त्री शरीराने आई बनते म्हणून मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी सर्वस्वी तिचीच हे बिंबवतात. मात्र त्यावेळी संस्कार कोणते करायचे हे ठरवण्याचे स्वातंत्र्य व हक्क तिला नाकारतात, हा पेच ओळखीचा, अनेक वेळा दिसणारा. अशा अनेक पुरुषसत्ताक रिवाजांतून स्त्रीचे मानसिक पातळीवर होत जाणारे खच्चीकरण आणि तिची वेदना याचे तिच्या बालपणापासूनच रूपांतरण होत जाते एका निशब्द सोशिकतेत. हे रूपांतरण करणारा असतो कधी पुरुषसत्ताक समाज तर



**बाईच्या कविता**

किरण येले

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ५० रुपये**

कधी खुद्द बाई. आणि मग सोशिकतेच्या सगळ्या परीक्षा पास झाल्यावर तिला सोशिकतेची मूर्ती म्हणून सादर केले जाते. अशा बारीक गोष्टींचा आलेख या कवितांत दिसतो.

रोजच्या संवेदनशून्य गर्दीत, एक दिवस, एका हिजड्याने, रडणाऱ्या एका हळव्या पुरुषाला आपल्या छातीशी घेत व्यवस्थेला आव्हान देत धीर देताना पाहताना, कवीला त्या हिजड्यात एक लढाऊ आणि त्याचवेळी व्याकुळतेने पान्हा फुटणारी 'बाई' दिसते, आणि मग दिसत राहते दिवस-रात्र, वेगवेगळ्या प्रसंगी. या झपाटलेल्या अवस्थेत कवी कविता लिहीत राहतो. आपल्या नेणिवेत दडून बसलेल्या, 'बाई'च्या प्रतिमेला खणून काढत राहतो. त्यात आकांत नाही, आक्रस्ताळेपणा नाही, बाईपणाची प्रतिमा लार्जर दॅन लाईफ करण्याचा प्रयत्न नाही. आहे फक्त 'स्व'शी चाललेल्या झटापटीत, जाणवलेल्या 'तिच्या' प्रतिमांचे चित्रिकरण. म्हणूनच या कविता वाचताना वाचक अस्वस्थ होतो. तसे झाले नसते तर कदाचित या कविता, फक्त रचना झाल्या असत्या.

*तुम्ही कधी पाहिलंय, की*
*बायका झोपेतून उठताच आधी*
*स्वप्नात मोकळे सुटलेले केस*
*एकत्र करत*
*बांधतात गच्च मानेवर*
*मग पदर सावरत*
*कपाळावरली टिकली चाचपतात गडबडीत*
*पडली असेल तर शोधतात सत्त्व*
*हरवल्यासारखी*
आणि जागेवरून सरकली असेल तर
डकवतात पुन्हा
विटक्या मूर्तीपायावर
नव्याने कुंकू लावावे तसे.

या आणि अशा अनेक ओळींतून कवीला जाणवत असलेल्या बाईच्या आंतरिक घुसमटीचे वास्तव चित्रण पाहताना वाचक त्यातल्या निरीक्षणाने अचंबित होत राहतो.

*बाई,*
*दिवेलागणीला देवापुढे*
*दिवा उजळते, हात जोडते*
*आणि पुटपुटत*
*ओठातला अंधार पोटात घेते.*

बाईच्या या सोशिकतेला पुरुष नैसर्गिक सामर्थ्य, असे गोंडस नाव देतो, पण त्याची बीजे असतात विषमता निर्माण करणाऱ्या बालपणात. म्हणूनच मुलगा जन्माला आला तर 'तलवार; आणि मुलगी झाली तर, पूर्वी

तिला 'दिवा' दाखवायचे, याचा अर्थ नंतर आगीत जळून मर असा असावा की काय असे प्रश्न पडत राहतात.

बाई माजघरात राब राब राबते, अगदी बेफाम, बेसावध. काम करत राहते, किचनमधल्या धारदार हत्यारांसोबत, स्टोव्ह, गॅसमधल्या आगीसोबत, पण तिला इजा होत नाहीत, असे म्हणताना कवी पुढे म्हणतो की

*सायंकाळी*
*पुरुष घरी परतू लागतात.*
*ती सावध होते*
*आणि तिला जखमा होऊ लागतात.*

पूर्वी दारात आलेल्या माणसाने, 'घरात कुणी आहे का?' असा प्रश्न विचारल्यावर माजघरातून बाया सांगायच्या, 'घरात कुणी नाही.' म्हणजे बायकांतील अभिजात मानवताही आम्ही जणू जाणीवपूर्वक विसरून गेलो होतो. मुली, स्त्री, आई-बाई यांच्याविषयी आतून दुश्या मिळाल्यानंतर कवी निरीक्षणे शब्दांकित करतो- कार्टुनमध्ये दंग, अस्ताव्यस्त बसलेल्या लहान मुलीला आई फक्त 'नीट बस' असे म्हणते आणि मुलगी दचकून फटकन जोडून घेते पाय हे सांगत पुढे कवी म्हणतो.

*आणि लहानवयातच कळू लागता मुलीला*
*आपले शेवाळी भाग*
*सवय होऊ लागते*
*कुणाच्या तरी सततच्या नियंत्रक नजरेची*
*पालनकर्त्याच्या आज्ञेची*
*आणि कुठूनही येणाऱ्या*
*अनाहूत कॉमेंटची.*

अशा अनाहूत कॉमेंटची सवय होणे हे काही समाजाच्या निरोगीपणाचे लक्षण नाही. लादलेले असे संकेत धूर्त व दुबळ्या पुरुषसत्ताक संस्थेने निर्माण केले आहेत. त्यामुळे, 'मी कोण?' या अस्वस्थ प्रश्नाला, 'स्वत:चे उत्तर नसणे' या अस्वस्थतेतून स्त्रियांचा हा प्रवास सुरू झाला आहे आणि 'मला जे हवे आहे ते मी होऊ शकते' या विश्वासाच्या दिशेने तो प्रवास सुरू आहे ही बाब विश्वासार्ह आहे, पण त्याचवेळी जोडीदाराशिवाय आपण असुरक्षित आहोत या न्यूनगंडातून बाईला बाहेर यावे लागेल, मानसिक सहजतेसाठी तिला स्वत:वरची कोळीष्टके झटकावी लागतील हेही या कविता वाचताना जाणवते. उदाहरणार्थ, कवी आपल्या अत्यंत साध्या निरीक्षणातून फार मोठे सत्य सांगतो.

*बाईला कितीही वाटलं तरी*
*तिच्या स्क्रीनवर*
*नवरा वा मुलांशिवाय*
*ती*
*कुणाचाही फोटो सेव्ह करत नाही*

यातल्या एका कवितेत म्हटल्याप्रमाणे, नात्यातले सूत्र मंगल राहवे (मंगळसूत्र) म्हणून केलेला अट्टाहास आणि त्यामुळे तिचीच होणारी ससेहोलपट याचे हे जिवेत उदाहरण. कवी यातल्या कवितेत कोणत्याही कॉमेन्टसच्या भानगडीत पडत नाही. हा या कवितांचा गुण आणि दुर्गणही. तो फक्त त्याच्या मनपटलांवरचे चित्रण थेट शब्दात व्यक्त करतो आणि फक्त तुम्हाला विचार करायला प्रवृत्त करत राहतो. पण त्याचवेळी त्याने निर्माण केलेली प्रतिमासृष्टी हीच एक मोठी कॉमेंट असते. उदाहरणार्थ, रिंगणखेळ या कवितेत मुलींनी आखलेली रिंगणे मुलाने खोडून टाकल्यावर मुली रडवेल्या होत घरी जातात आणि आईला तक्रार करतात तेव्हा आई म्हणते की घरातल्या लाद्यांचे चौकोनच रिंगण समजून खेळा. इथे कवी म्हणतो, की इथून चालू होतो मुलींचा घरातला रिंगणखेळ.

कवीचा चाललेला आंतरिक संघर्ष काही ठिकाणी अधिक धारदार होतो आणि एका ठिकाणी तो आदिमातेलाच आर्जव करताना म्हणतो, की -

*बये, महामाये*
*आता तरी ओळख स्वत:ला*
*स्वत:च्याच अवगुंठनातून बाहेर काढ स्वत:ला*
*त्यांनी कालवलेल्या मातीगोळ्यात*
*वर्षानुवर्षे स्वत:ला घडवत राहिलीस*
*स्वत:च्याच शिल्पात स्वत:ला चिणत राहिलीस*
*घुसमटलीस, तरीही तुझ्या नावानं चाललेल्या*
*षोडशोपचारात सुखावलीस.*

किंवा विवाहसंस्थेतील वैगुण्य दाखवताना तो टोकदार होत म्हणतो, विवाहसंस्था म्हणजे एकाच लिफ्टमध्ये प्रवास करणाऱ्या पुरुष-स्त्रीसारखी असते दोघांनाही लिफ्ट हवी असते, दोघांच्याही मनात आपल्याला कुठे जायचंय याचे आडाखे बांधलेले असतात.

*फरक फक्त इतकाच की लग्नानंतर*
*लिफ्ट बाईला हव्या असलेल्या मजल्यावर*
*थांबण्याऐवजी*
*पुरुषाला हव्या असलेल्या मजल्यावर*
*थांबण्याची शक्यता अधिक.*

एका कवितेत 'सुरमई'ची वैशिष्ट्ये सांगत असताना कवी अकस्मात वाचकाला 'बाई'च्या वैशिष्ट्यांपर्यंत आणून सोडतो आणि आपल्या तोंडून नकळत 'व्वा'ची दाद येते. ती दाद असते पुन्हा एकदा कवीच्या सोलवटून घेण्याला. गायीनं त्वचा हलवून माश्या उडवाव्यात तसे शरीरावरच्या नजरा उडवणे एवढेच बाईच्या हाती आहे काय?

किती लिहिले तरी हे सरणार नाही, हा बाईपणाचा शब्दखेळ नाही तर फक्त शब्दात सापडलेला बाईचा एक अंश आहे, याची कवीला नम्र जाणीव आहे. कवितेचे बोट धरून केलेला हा कवीचा चिंतनप्रवास आहे. गुंता सोडवण्याचा विफल प्रयत्न आहे असे कवीच म्हणतो आणि शेवटी बाईला,''खूप थकलो सये बये लिहिताना तुला'' म्हणत, वाचकांच्या सुसंस्कृत म्हणवल्या जाणाऱ्या पुरुषी जाणिवांना धक्का देत ईमरोजनं विचारलेला प्रश्न विचारतो, की 'आदमी औरत के साथ सोता है, जागता क्यों नही?'

**संदेश ढगे**
कासार आळी,
शहापूर -४२१ ६०१
जिल्हा-ठाणे.
दूरध्वनी : ०२५२७- २७१३०४

# विरजण, तुरटी की कॅटॅलिस्ट?

सु.गो. तपस्वी

मानवी उत्क्रांती होत असताना, क्रमाक्रमानं, टोळ्या, जमाती, राज्यं आणि कालांतरानं स्वतंत्र भौगोलिक देश निर्माण झाले. त्या देशांतही दुसऱ्याच्या अंमलाखाली असलेल्या, पण फायदेशीर ठरणाऱ्या, प्रदेशाला आपल्यात सामावून घेण्यासाठी वा परिसरात वर्चस्व राखण्यासाठी मारामाऱ्या झाल्या, ऐतिहासिक लढाया झाल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र संयुक्त राष्ट्राच्या निर्मितीमुळे गेल्या पन्नास-साठ वर्षांत अशा घटनांना आळा पडत गेला आणि स्वतंत्र देशातील कायद्यांची रचना व अंमलबजावणी त्या त्या देशातील राज्यकर्त्यांची जबाबदारी मानली गेली.

प्रत्येक देशाचा कारभार तेथील राज्यपद्धतीनुसार चालत असतो. कुठे सरंजामशाही, कुठे एकाधिकारशाही तर कुठे लोकशाही. व्यवस्था राखण्यासाठी मात्र सर्वत्र कायद्याचं माध्यम वापरलं जातं. कायदे तयार करण्यासाठी अनेक उद्दिष्टं असतात आणि विषयानुरूप त्यांचं तीन क्षेत्रांत विभाजन केलं जातं- संरक्षण, अर्थकारण व समाजकारण. अस्तित्वात आलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याची रीतसर प्रक्रिया अशी असते - कायदा करणं, तो मोडणाऱ्यांना पकडणं, पकडलेल्या लोकांवर आरोप करून खटला भरणं, न्यायालयात तो गुन्हा औपचारिकरीत्या सिद्ध करणं आणि सिद्ध झालेल्या गुन्हेगाराला कायद्याच्या तरतुदीनुसार शिक्षा ठोठावून शिक्षा भोगायला भाग पाडणं. अंमलबजावणी जर रीतसर होत नसेल तर तो कायदा लवचिक मानला जातो. अशा कायद्यांतील पळवाटा शोधल्या जातात, त्यांचं विश्लेषण केलं जातं, पळवाटांचं निवारण करण्याकरिता मार्ग व पद्धती शोधल्या जातात; ते ते कायदे कडक केले जातात. तरीही कायदा मोडण्याचे प्रसंग जर अपेक्षेपेक्षा जास्त आहेत असा अनुभव असेल, तर ते का, हे शोधणं गरजेचं ठरतं.

आपल्या देशातील शासनाच्या कारभारावर, समाजाच्या कायदा मोडण्याच्या मनोवृत्तीवर आणि त्यातून बोकाळणाऱ्या भ्रष्टाचारावर विचार करताना उपरोक्त प्रश्न मला भेडसावू लागला. त्या भेडसावण्यातूनच 'जनसंवाद' हा वैचारिक गट उदयास आला. समग्र विचारश्रृंखलेतून माझी खात्री पटली, की कायदे व त्यांचं पालन ही बाब समाजाच्या संबंधातील वृत्तीवरच अवलंबून असते. कायद्याच्या पालनातून स्वत:चा फायदाच साधला जातो, हा दूरगामी दृष्टिकोन नसेल तर नजीकच्या फायद्यासाठी पळवाटा शोधण्याकडे व्यक्तीचा कल राहतो. कायद्याचं पालन होण्यासाठी मग शिक्षेच्या भीतीची गरज भासते.

सरंजामशाहीत वा एकाधिकारशाहीत 'राजा' आणि 'प्रजा'-प्रस्थापित शासन व समाज - असे दोन वेगवेगळे गट असतात; पकडलं जाण्याची भीती असल्यामुळे शिक्षेच्या दडपणाखाली समाजाच्या स्वैर प्रवृत्तीला आळा घातला जातो. लोकशाहीत कायद्याचं असं पालन साधणं कठीण जातं कारण गट वेगवेगळे नसतात, त्यांत फरक नसतो; कायदा मोडणारे व शिक्षा देणारे एकच असतात. त्याच समाजाचे, एकाच मनोवृत्तीचे प्रतिनिधी असतात.

लोकशाही राज्यव्यवस्था राबवण्यासाठी समाजाची वृत्ती 'लोकशाही-धार्जिणी' असावी लागते. आजवरच्या अनुभवातून वारंवार प्रकट झालेली आणि ह्यापूर्वीच्या लिखाणांत सविस्तरपणे मांडलेली संबंधित कारणमीमांसा थोडक्यात अशी आहे- 'पश्चिम' युरोपात लोकशाही राज्यपद्धती उदयास आली. तेथील देशांत ती राज्यपद्धती उदयास येत असतानाच्या शे-दीडशे वर्षांच्या कालावधीत होत असलेल्या फायद्यांच्या अनुभवातून सामाजिक मानसिकतेत लोकशाहीसाठी पोषक वृत्ती जोपासली गेली. लोकशाहीचं परदेशी रोप आपल्या मातीत लावताना मात्र गरजेची मशागत करण्यास आम्ही विसरलो, कमी पडलो. सरंजामशाहीत जोपासल्या गेलेल्या भारतीय समाजाला एका रात्रीत लोकशाही राज्यपद्धतीला सामोरं जावं लागलं!'

'कायद्याच्या पालनातूनच लोकशाहीत लोककल्याण साधलं जाईल' हे तत्त्व भारतीय जनतेच्या अंगवळणी पडण्यासाठी पश्चिम युरोपासारखं आपल्यालाही शे-दीडशे वर्षं थांबावं लागेल. त्या दरम्यान, इतरत्र काही ठिकाणी घडलं तसंही होऊ शकतं, की सतत ढासळणारी परिस्थिती अनागोंदीकडे झुकेल आणि आपल्यालाही लष्करी राजवट वा एकाधिकारशाहीला सामोरं जावं लागेल; जे आणीबाणीच्या काळात आपण अनुभवलं आहे. उपरोक्त भाकीत करण्यासाठी कोणा तज्ज्ञाची गरज नाही, ह्या विचारावर मी येऊन ठेपलो. म्हणूनच, समाजात लोकशाही मनोवृत्ती जोपासण्याच्या प्रक्रियेला गतिमान केलं पाहिजे. स्वाभाविक प्रक्रियेमुळे शे-दीडशे वर्षं थांबण्याऐवजी त्या प्रक्रियेला वेग देण्यासाठी मग मी कॅटॅलिस्ट शोधू लागलो. (कॅटॅलिस्ट : रासायनिक प्रक्रिया जलद

करण्यासाठी साहाय्यभूत ठरणारा पदार्थ – साहाय्यक.) समाजात 'लोकशाही-धार्जिणी' मनोवृत्ती निर्माण करणं हेच आजच्या आपल्या समाजसुधाराचं एकमेव लक्ष्य असलं पाहिजे. शे-दीडशे वर्षांचा तो कालावधी आटोक्यात आणण्यासाठी समाजसुधाराच्या प्रक्रियेत 'औपचारिक समाजशिक्षणाचा' कॅटॅलिस्ट वापरण्याच्या शक्यतेवर मग मी विचार करू लागलो.

'औपचारिक समाजशिक्षणा'त पुढील गोष्टींचा समावेश केला तर उद्याचा नागरिक घडवण्यात यश येईल, कारण आजच्या समाजाच्या मानसिकतेतील उणिवा अशा शिक्षणानं दूर होतील.

- लोकशाही ही निव्वळ राज्यपद्धती नसून ती एक मानसिकता आहे, ह्या बाबीचं आकलन होण्यासाठी लोकशाहीची तत्त्वं,
- जलद होणाऱ्या नागरीकरणाच्या समस्येवर मात करण्यासाठी गरजेचं नागरिकत्व,
- भारतीय म्हणजे कोण-भारतीय नागरिकाची संविधानातील व्याख्या, हक्क व जबाबदारी
- संविधान व शासनपद्धतीबाबत समर्पक माहिती,
- वैयक्तिक व सार्वजनिक वर्तणूक, त्यांतील फरक आणि सामाजिक बांधिलकी,
- धर्मनिरपेक्षता, समता व मानवी हक्क, इत्यादी.

वृत्ती जोपासण्यासाठी असं शिक्षण बालवयातच दिलं पाहिजे, कारण तेच संस्कारक्षम वय असतं. संस्कार मनावर बिंबवण्यासाठी पालक वा धर्मसंस्था आजच्या काळात असमर्थ आहेत आणि शालेय शिक्षणातूनच उद्याचे नागरिक घडवता येतील, असं जनसंवादला वाटतं. हा विचार माझ्यासारख्या सामान्य पण संवेदनशील माणसाला योग्य वाटेल, पण अशा शिक्षणातून उद्याची पिढी घडवता येईल का, हा प्रश्न तज्ज्ञांकडून तपासून घेतला पाहिजे ह्या भावनेतून दोन महिन्यांपूर्वी एक चर्चासत्र आयोजलं होतं. मानव्यशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि प्रगत शाळांतील प्रतिनिधींचा तज्ज्ञ-मंडळीत समावेश होता. अशा दहा-पंधरा विचारवंतांना 'जनसंवाद'ने उपरोक्त प्रश्नावर विचारविनिमय करण्यासाठी पुण्यात एकत्र आणलं. संक्षिप्तात, त्यांना पुढील प्रश्न विचारले गेले.

- समाजशिक्षणाची प्रस्तुत 'औपचारिक शिक्षणपद्धती' भारतभरातील शालेय शिक्षणात राबवली तर उद्याची पिढी संस्कारित करता येईल का?
- प्रस्तुत अभ्यासक्रम तयार करण्यासाठी व गरजेची पेडगॉगी (पद्धती) निवडण्यासाठी देशातील शिक्षणतज्ज्ञ समर्थ आहेत का?
- आजच्या शाळांतील शिक्षकांकडून असा उपक्रम राबवून घेण्यासाठी त्यांना गरजेचं प्रशिक्षण देणं तज्ज्ञांना शक्य होईल का?

आनंदाची बाब म्हणजे ह्या तिन्ही प्रश्नांवर प्रस्तुत विचारवंतांची प्रतिक्रिया सकारात्मक होती.

'जनसंवाद' हा वैचारिक गट उदयास येण्यापूर्वी महाराष्ट्रातील गावोगावी 'काळाची गरज' हा माझा लेख (संदर्भ : 'विकासाची रूपरेषा', ग्रंथाली प्रकाशन, २००९) मी शे-दीडशे व्यक्तींकडे पाठवला होता. लेखाचा प्रस्ताव होता- उपरोक्त समाजसुधारासाठी 'औपचारिक व शास्त्रोक्त समाजशिक्षण' हा विषय अनिवार्य मानून शालेय शिक्षणात समाविष्ट करण्याचा. ठिकठिकाणी झालेल्या चर्चांमध्ये एक प्रश्न मला वारंवार विचारण्यात आला. तो म्हणजे- अशा शिक्षणामुळे घडवलेले उत्तम नागरिक जेव्हा आजच्या भ्रष्टाचारी समाजात वावरतील तेव्हा ते भांबावतील का? समाज त्यांना सुद्धा बिघडवेल ही भीती व्यक्त झाली.

अंनिसचे (अंधश्रद्धा निर्मूलन समिती) डॉ. नरेंद्र दाभोलकर ह्यांच्याबरोबर 'काळाची गरज' ह्या लेखावर माझी चर्चा सुरू होती. उपरोक्त प्रश्नावर त्यांची प्रतिक्रिया अशी होती, की आजही प्रयत्न होताहेत, परंतु ते मर्यादित आहेत. ते काम एखाद्या प्रचंड गढूळ जलाशयाला स्वच्छ करण्याचं आहे; चिमूटभर तुरटीनं ते साधलं जाणार नाही. परंतु, योग्य प्रमाणात तुरटी वापरली तर ते साध्य होईल. ह्या प्रश्नावर विचार करताना मलाही एक रूपक सुचते. पावसाळ्यात नदीनाल्यांना पूर येतात. तेव्हा, समुद्राच्या किनाऱ्यावरील पाण्यातील क्षार कमी होतात. पावसाळा संपल्यावर मात्र तेच किनाऱ्यावरील पाणी समुद्राच्या पाण्याइतकंच खारट होतं. मात्र, आपण जर नेहमी पावसाळा राखू शकलो तर कालांतरानं किनाऱ्यावरील पाणी जवळपास क्षारविरहित होईल. समाजशिक्षणाच्या प्रस्तुत प्रस्तावा-नुसार दरवर्षी शिक्षित पिढ्या एकीकडे समाजात येत राहतील व आजच्या समाजा-तील 'क्षारयुक्त' मंडळी दरवर्षी काळाच्या पडद्याआड जात राहतील. आठ-दहा वर्षांत समाज क्षारविरहित होईल का नाही?

कुमार सप्तर्षी म्हणतात, (संदर्भ : प्रस्तावना, 'विकासाची आशा', ग्रंथाली) ''पाच टक्के लुच्चे, पाच टक्के सच्चे आणि नव्वद टक्के कच्चे (प्रत्येक समाजात) असतात. कच्च्यांवर ज्यांचा प्रभाव पडेल ते जिंकतात.'' पाच टक्के सच्च्यांची आजची हतबलता आपण अनुभवतोच आहोत. समाजातील सरंजामशाही वृत्ती आहे तशीच राहिली तर समाज नाशू शकतो, सत्शक्ती कुचकामी ठरते. दूध तसंच ठेवलं तर नासणारंच! परंतु, त्याचं दही केलं तर सत्शक्तीचं लोणी होतं. आजच्या निष्प्रभ ठरणाऱ्या पाच टक्के सच्च्यांना खंबीर करण्यासाठी, दुधाचं दही करण्याकरिता गरजेचं विरजण पुरवण्यासाठी अथवा गढूळ जलाशयातील गाळ खाली बसवण्यासाठी गरजेची असलेली तुरटी प्रस्तुत प्रस्ताव निश्चित पुरवू शकेल. तुरटीचा कॅटॅलिस्ट समाजसुधाराची प्रक्रिया गतिमान करू शकेल. ह्या खात्रीमुळेच 'जनसंवाद' प्रयत्नशील आहे.

**सु. गो. तपस्वी**
समन्वयक-जनसंवाद
भ्रमणध्वनी - ९७६६१ ५२२५३
suhas@fandsindia.com

# छाया कोरेगावकरांची कविता...

## संजय पवार

छाया कोरेगावकर यांची कविता, मराठी नियतकालिकं/अनियतकालिकं वाचणाऱ्या, त्यातील कविता आवर्जून वाचणाऱ्या वाचकांना अपरिचित नाही. विशेषत: डाव्या परिवर्तनवादी विचारांच्या नियतकालिकांच्या वाचकांना.

मराठी साहित्यात 'साठोत्तरी साहित्य' म्हणून एक परिवर्तन घडल्यानंतर, पंच्याहत्तरच्या आतंरराष्ट्रीय महिला वर्षानंतर मराठी साहित्यात स्त्रियांचं म्हणून दखलयोग्य साहित्य प्रकाशित होऊ लागलं. दखलयोग्य या अर्थानं, की त्यानंतर स्त्री मुक्ती चळवळींनी भारतीय/मराठी स्त्रीला वेगळी ओळख दिली. आत्मभान, आत्मसन्मानाची जाणीव दिली आणि लक्ष्मीबाई टिळक, विभावरी शिरूरकर, इरावती कर्वे अशा लेखिका व त्यांचं साहित्य पृष्ठभागावर आलं. दरम्यान गावोगावच्या वाचनालयांतून, मराठी मासिकांतून त्यावेळच्या प्रसिद्ध लेखिकांचं साहित्य हे 'खांडेकरी-फडके' वळणाचं होतं. शिक्षण व आधुनिक दृष्टिकोन यांतून स्त्रियांच्या लिखाणाला वेगळे आयाम मिळत गेले. त्यातून पुढे कमल देसाई, गौरी देशपांडे ते आजच्या मेघना पेठे, कविता महाजनांपर्यंतचा प्रवास झाला आहे. तरी समांतर दलित, बहुजन, ग्रामीण साहित्यातली स्त्री लेखिका (ज्योती लांजेवार, हीरा बनसोड, उर्मिला पवार, प्रज्ञा पवार, मीनाक्षी मून इत्यादी अनेक) अजूनही त्या अर्थानं पृष्ठभागावर नाहीत.

साहित्यामध्ये सर्वांत उदंड प्रकार 'कवितेचा'! त्यामुळे स्त्री साहित्यातही 'कविता' उदंडच झाली. साठोत्तरी साहित्यजाण मराठी साहित्याला येईपर्यंत, बहिणाबाईंसह इतर संत कवयित्रींचं लेखन ओव्या, अभंग म्हणूनच ओळखलं जात होतं. त्यांच्या लेखनाला 'साहित्य' म्हणून स्वीकारण्याची तसदी मराठी साहित्यानं घेतली ती साठोत्तरी आणि दलित साहित्याच्या आगमनानंतर.

हा सगळा इतिहास सांगण्याचं प्रयोजन यासाठी, की साठोत्तरी साहित्यानंतर जो दलित, ग्रामीण, आदिवासी साहित्याचा मोठा प्रवाह मराठी साहित्यात आला त्यात या समूहातील स्त्रियाही लिहू लागल्या, व्यक्त होऊ लागल्या. छाया कोरेगावकर विसाव्या शतकाच्या अखेरच्या दोन दशकांत, ज्या दलित, बहुजन, आदिवासी स्त्रिया लिहू लागल्या त्यांपैकी एक आहेत. त्यांच्या लेखनातून, कवितेतून येणारी सामाजिकता या सर्व पार्श्वभूमीतून येते.

कविता हा कुणालाही लिहिता येणारा सोपा साहित्यप्रकार आहे किंवा यमक जुळवता आलं किंवा हल्लीच्या काळाप्रमाणे निबंध अथवा विनोद पद्यमय करून सांगितला म्हणजे कविता तयार होते असा जो (गैर)समज पसरला आहे, त्यामुळे कवितेकडे फार गांभीर्यानं पाहिलं जात नाही. सातत्यानं मंचावर आपल्या त्याच त्या कविता सादर करणाऱ्या कवींशिवाय इतर कवी उपहास आणि उपेक्षेचेच बळी पडतात.

ज्याला कविता लिहिता येते तो कवी, ही फारच ढोबळ व्याख्या झाली. 'कवी असणं' ही एक वेगळी गोष्ट आहे. सर्वच कवी त्या अर्थानं कवी नसतात. छाया कोरेगावकर मात्र त्या अर्थानं कवी आहेत. साधारण दोन दशकांहून अधिक काळ त्या कवितालेखन करताहेत तरीही हा त्यांचा दुसराच कवितासंग्रह आहे.

कवितासंग्रहांच्या संख्येवर 'कवी असणं' अवलंबून असतं का, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. तर त्याचं उत्तर नाही असं आहे- एकदा कवी आणि त्याची कविता 'प्रसिद्ध' होऊन गावोगाव फिरू लागली, की प्रकाशक पुढे सरसावतात आणि मग कविता करणं, होणं हा प्रकार होऊ लागतो. छाया कोरेगावकर अजून त्या 'स्थिती'पर्यंत पोचलेल्या नाहीत. (पोचल्यावर त्या काय करतील हे पाहणं उद्बोधक राहील.)

या न पोचण्याचं कारण त्यांच्या अजूनपर्यंतच्या कवी असण्यात दिसतं. त्यांच्या या संग्रहातल्या आणि याआधीच्या 'आकांत प्रिय माझा' संग्रहातील कविता वाचल्यानंतर एक 'घुसमट' आपल्याला जाणवते. त्या घुसमटीला, तगमगीला वाट करून देण्यासाठी त्या कवितेचं माध्यम निवडतात. कारण म्हटलं तर हे माध्यम 'आत्ममग्न' आहे म्हटलं तर लोकाभिमुख! त्यामुळेच कधी कधी त्यांची कविता 'स्व'विषयी बोलते तर कधी ती अखिल 'स्त्री'जातीची होते.

या संग्रहात शीर्षक नसलेल्या चाळीसहून अधिक कविता आहेत. शीर्षकातून आशयाचं दिशादिग्दर्शन करायचं त्यांनी हेतूपुरस्सर टाळल्याचं दिसतं. त्यांच्या या सगळ्या कवितांचा आशय हा 'स्त्री' आहे. स्त्रीच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, लैंगिक अशा सगळ्याच अवस्थांना त्या भिडतात. किंबहुना, त्या तिला कवटाळूनच बसल्या आहेत.

परिवर्तनवादी चळवळीत काम केल्यावर, त्या विचारांना आदर्शभूत

मानल्यानंतर प्रत्यक्ष जीवनात त्या विचारानं जगताना अनेकांना, विशेषत: स्त्रियांना विरोधाभास, अंतर्विरोध यांना सामोरं जावं लागतं. त्यांच्यासाठी ही नवी 'लढाई, अंतर्गत लढाई' लढावी लागते.

समानता, शोषण यावर बोलणारा पुरुष, स्त्री-पुरुष नात्यात मात्र 'पुरुष'च राहतो. तेव्हाची घालमेल, घुसमट, हतबलता गुप्तरोगाप्रमाणे सांगता येत नाही व सहनही होत नाही अशी असते.

छाया कोरेगावकर या घुसमटीला वाफ देतात आणि त्या निव्वळ 'स्त्री' होऊन, दलिताहून दलित अशा 'स्त्री'चा आवाज बनतात.

विशेष म्हणजे हा आवाज लिंगभावाच्या पलिकडे जात, धर्म, वर्ण, वर्ग या सर्वांना ओलांडून जातो. एखाद्या आदिम वेदनेसारखी ही ठसठस त्यांच्या शब्दांतून व्यक्त होत राहते.

पहिल्याच कवितेत त्या 'लढवय्या' पुरुषांना सांगतात-

*तिच्या मुक्तीच्या वल्गना*
*करणाऱ्या लढवय्यानीच*
*मुक्त व्हायला हवं*
*'पुरुष' नावाच्या*
*अनाम गुंगीतून!*

छाया कोरेगावकर सतत किंवा सातत्यानं आपलं 'स्त्रीपण' व पर्यायानं समस्त स्त्रीला एक्स-रे मशिनमध्ये टाकून स्वत:ला व जगाला विचारत राहतात-

*शरीराच्या कोणत्या बिंदूपासून*
*सुरू होतं बाईचं बाईपण?*

आणि मग 'स्त्री' म्हणून सगळे प्रवास समजून, उमजून घेतल्यावर, सर्व परिवर्तनांचे ग्रंथ उलटेपालटे करून झाल्यावर, सर्व लढाया, तह झाल्यानंतर अटळ सत्य सापडल्यासारखं त्या लिहितात-

*कुंकवाचं काही खरं नसतं*
*गोंदण मात्र तुझंच असतं*
*सरणापर्यंत मी असेन*
*मरण तुझ्या एकटीचं असतं*

हे लिहिताना त्या सावित्री होतात आणि आधुनिक जोतिबानं दिलेला सल्ला त्या उद्धृत करतात! यातूनच परिवर्तनाच्या, अगदी स्त्रीमुक्तीच्या लढ्यातही खांद्याला खांदा लावून चालणारा साथी, कॉम्रेड, सैनिक शेवटी कसा निखळ पुरुष म्हणून उरतो हे महात्म्यांचीच प्रतिकं वापरून त्या सप्रमाण दाखवून देतात. पण अशा वैचारिक निराशेनंतरही त्यांची कविता पुरुषविरोधी होत नाही. ती समंजसच राहते (पुन्हा स्त्री गुण!) रमाईवरच्या कवितेतून महात्म्यांच्या बायकांना सोसावं लागणारं ऊन छाया कोरेगावकर दाखवतात. कारण या बायका महात्म्यांच्या 'सावली' होऊन राहिल्या!

दलित, बहुजन स्त्री लेखिकांनी सीता, द्रौपदी यांची दु:ख मांडताना यशोधरा, सावित्री नि रमाईची घुसमटही व्यक्त केली. ही नोंद करण्याचं कारण सीता, द्रौपदीबद्दल लिहिलं की हिंदू देवतांचं मूर्तिभंजन होतं असा टाहो फोडला जातो. पण 'माणूसपणाची' दीक्षा घेतलेल्या छाया कोरेगावकरांसारख्या लेखिका, त्या वंदनीय महात्म्यांनाही सोडत नाहीत!

छाया कोरेगावकरांची कविता जशी एका बाजूला स्त्रीला एका परिवर्तनाच्या लढ्याशी जोडते तशीच दुसऱ्या बाजूनं 'स्त्री' म्हणून निर्माण होणाऱ्या नैसर्गिक भावना, आसक्ती, असोशी, भोग यांच्याशीही संवाद साधते. स्त्री शरीराची म्हणून जी नैसर्गिक आवर्तनं, बदल आहेत, तेही त्यांना तितकेच आकर्षित करतात. ते 'जगणं'ही त्यांना जगायचंय आणि इतर स्त्रियांनाही ते तसं जगायला मिळावं अशी आच त्यांच्या कवितांतून दिसते.


*माझा स्पर्शोत्सुक देह आता*
*होऊ पाहतोय मुक्त सीमित*
*आदिबंधातून*

## एक अवकाश माझंही

छाया कोरेगावकर

**मूल्य ६० रुपये**

**सवलतीत ३५ रुपये**




जीवनानुभवाचं सच्चेपण मांडणारी छायाची कविता ही वेदनेचा हुंकार आहे. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेताना होणारी तडफड, असह्यता या कवितेतून अधोरेखित होत असली तरी कुठलाही आक्रस्तळेपणा तिच्यात नाही. त्यामुळे कवितेतलं 'सत्त्व' हरवलेलं नाही. जीवनातल्या उणिवांसह जाणिवेचं रसरशीतपण टिकून असल्यानं ही कविता जशी दाहक आहे तशीच मोहकही आहे. बदलत्या काळाचे हे पडसाद अपरिहार्य आहेत. कवितेत आधुनिक प्रतिमांचं नेटकं रूप, प्रवाही जीवनशैलीचं नेमकं वर्णन आहे. मात्र केवळ आधुनिकतेच्या हव्यासाची बाधा या कवितेला नाही. वास्तवाच्या जवळ नेणारी, मनाचा ठाव घेणारी छायाची कविता अस्वस्थ करणारी आहे. जे जे जगले, भोगले त्याला शब्दरूप आले, अशी छायाची कविता रसिकांना नक्कीच आवडेल. तिच्या काव्यप्रवासाला मन:पूर्वक शुभेच्छा!

**– अस्मिता गुरव**

किंवा

*संभोगाच्या अटळ विरामानंतर*
*पुसला जातो त्वचेवरचा*
*सखोल स्पर्शाचा दरवळ निर्लेपपणे.*

किंवा

*‘ती’च्या सर्जक बोटाचा अथक*
*प्रवास*
*तृषार्त एका सखोल संवेदक*
*स्पर्शासाठी.*

यातून व्यक्त होणारी शारीर जाणीव, तसेच

*पेलवत नाही शब्दांना*
*तुझी असीम असोशी*

किंवा

*तिला पाऊस लागतो*
*कडक डोहाळ्यांसारखा*

किंवा

*तू नाकारलास माझ्या केसांतला*
*लडिवाळ मोगरा*

किंवा

*ती मिणमिण जगते*
*वेदनेला तेवत ठेवून*

अशा ओळींतून व्यक्त होणारा समंजस स्वर हा ‘युद्ध नको म्हणून पुढे केलेला बुद्ध आहे’ की आत्यंतिक निराशेनंतर पुन्हा तहासाठी फडकावलेलं पांढरं निशाण आहे, हे वाचकांनी ठरवावं.

आपल्या अनुभवांना, त्यातल्या विविध भावनांना संयमानं शब्दांत बांधताना छाया कोरेगावकरांचा बांध फुटतो आणि मग त्या


*कविता*
*एक विरेचन*
*कविता*
*एक हस्तमैथुन*

इथपासून सुरू होऊन

*कविता म्हणजे मूळव्याध*

इथपर्यंत पोचतात. अशा अपवादात्मक येणाऱ्या ओळीतूनही त्यांची ‘घुसमटच’ आपल्याला जाणवते.

छाया कोरेगावकरांचा हा नवा संग्रह विसाव्या शतकाच्या अखेरीस ‘स्व’भान आलेल्या लेखिकेचा संग्रह आहे. एका अर्थानं हा विसाव्या शतकातल्या स्त्री-पुरुष संबंधाचा एक मर्यादित दस्तऐवज आहे.


**असाही एक महाराष्ट्र**


**संदेश भंडारे**

संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांचं विचारप्रवर्तक पुस्तक. मध्यमवर्गीय कक्षेबाहेरचा एक मोठा समाज त्यातून मूर्त झालेला आहे. सर्वसाधारण शहरी माणसाच्या विचारापलीकड्या महाराष्ट्र इथे साकार झाला आहे...
वसंत आबाजी डहाके यांची प्रस्तावना त्याचे महत्त्व विशद करते.

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

**लालबाग**

**आदिनाथ हरवंदे**




आज टॉवरसंस्कृतीच्या विळख्यात जात चाललेल्या ‘लालबाग’चा गेल्या आठ दशकांचा सामाजिक इतिहास साकारलेला हा ग्रंथ एक उल्लेखनीय दस्तऐवज ठरणार आहे...

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २४० रुपये**
**घरपोच २७० रुपयांत!**